# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

Price ₹ 3/-

|| स्वयमेव मृगेंद्रता ||

# संवाद

*मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ।।*
*सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ।।*

**Vol.-4** **Issue - 11** मे - २०१२ **May 2012**


## संपादकीय

**प्रिय सभासदमित्रांनो,**

'संवाद'चा मे महिन्याचा हा अंक सादर करताना अनेक गोष्टींची आठवण होत आहे. महाराष्ट्र स्थापनेला नुकतीच ५० वर्षे पूर्ण झाली. पहिले मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांची जन्मशताब्दी सध्या चालू आहे. महाराष्ट्र स्थापनेच्या वेळीच यशवंतरावांनी काही निर्णय असे घेतले की त्यामुळे केवळ राजकारणच नव्हे तर कृषि उद्योगच काय पण कला, क्रीडा आणि साहित्य क्षेत्रात नवे वारे वाहू लागले. पुढे हा सह्याद्री भारताचा खड्‌गहस्त होण्यासाठी दिल्लीला गेला. त्या घटनेला या नोव्हेंबरात ५० वर्षे पूर्ण होतील.

या मे महिन्यातच रवीन्द्रनाथ टागोर हे भारताला सर्व प्रथम नोबेल पारितोषिक मिळवून देणारे महाकवी, यांची १५० वी जयंती. त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले तेव्हा स्वा. सावरकर अंदमानात होते. तेथूनच त्यांनी रवींद्रनाथांच्या अभिनंदनपर एक सुंदर कविता धाडली. सावरकर म्हणतात -

श्रीविक्रम सिंहासन ते । अद्यापही लुप्तचि तरि ते ।
वीणा की तरि अवतरते । त्वत्करीं । कारागृहिं कांचनगेहा।
हे बंदीराज रवींद्रा । शृंखला राजबंदी हा वंदितो ।

स्वा. सावरकर हे ही महाकवीच. त्यांचा जन्मही मे महिन्यातच. म्हणून या दोन महाकवींचे स्मरण. इतिहासातील हे टप्पे सिंहावलोकनासाठी नोंदविले आहेत.

सध्याचा मे महिना म्हणजे ग्रीष्म ऋतु. संस्कृतमध्ये 'निदाघ' काल असे त्याचे वर्णन आहे. (प्रचण्ड सूर्य: स्पृहणीय चन्द्रमा: सदावगाहक्षमवारिसंचय:। दिनान्तरम्योऽभ्युपशान्तमन्मय: निदाघकालोऽयमुपागत: प्रिये।।) चैत्र वैशाखाला मधु माधव म्हणतात. सध्या मात्र सर्वत्र पाण्याचा दुष्काळ आहे. समर्थ रामदास स्वामींनी ३५० वर्षांपूर्वी दुष्काळातील अन्नान्न स्थितीचे विदारक वर्णन केले आहे. पण आज मात्र पाण्याची हाकाटीच संत्रस्त करत आहे.

आज मात्र सर्वत्र 'पाणी पाणी' अशीच हाकाटी चालू आहे. मग ते खेडे असो वा महानगर असो. १९७२ मध्ये पडलेल्या भीषण दुष्काळाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. तिकडे कोकणात आंब्याच्या उत्पादनाने मार खाल्ला आहे. सर्व सुखी कोणी नसतो. पण थोडे तरी सुख मिळायला हवे ना!

नियोजनाचा अभाव चोऱ्या, प्रादेशिक ओढाताण यांचा परिणाम म्हणजे 'दैव देते अन् कर्म नेते' अशी अवस्था. या अस्मानी बरोबर सुलतानी म्हणजे जबरदस्त करवाढ आहे. सेवाकर, पेट्रोल, गॅस दरवाढ आहे. परिणामी मर्यादित निवृत्ती वेतनाची तोंडमिळवणी कशी करायची? तिकडे सुप्रीम कोर्टात सुनावणी लांबत चालली आहे ती गोष्ट वेगळीच.

मित्रांनो, या कथेला, रडकथेला अंत आहे का नाही? असे आपण विचाराल. या कृष्णमेघाला रूपेरी किनार आहे का नाही? आहे. पण ती आपणच शोधायची असते. दिवसाच्या चोवीस तासात आपण सतत पोटापाण्याचीच चिंता थोडीच करतो? मनाला विरंगुळा, मानसिक स्वास्थ्य मिळविण्यासाठी कला आहे, क्रीडा आहे, गायन आहे, वादन आहे, ब्रह्मविद्या आहे. शक्य झाले तर देशी, स्वदेशी पर्यटनाबरोबरच परदेशी पर्यटन आहे. (तरी पण अखेर 'गड्या आपुला गाव बरा'वर माणूस येतोच) अगदीच काही जमत नसेल तर यथाशक्य समाजात मिसळून किंचित काल या चिंतांचा परिहार करणे शक्य आहे. शिवाय आवडीचे कथा, कादंबरी, नाटक, प्रवास वर्णन, चरित्र, आत्मचरित्र इ. वाचन करण्यात वेळ कसा जातो ते कळत नाही. आवड असेल, मानसिक कल असेल तर ज्ञानेश्वरी, गाथा, दासबोध इ. मराठी ग्रंथांचे वाचन आजही आपणाला प्रचंड ऊर्जा देते असा अनुभव सांगणारे असंख्य लोक आहेत. कारण शेवटी मनसि च परितुष्टे कोऽर्थवान् को दरिद्र:? किंवा ''मन चंगा तो कटौतीमें गंगा!''

कविवर्य मंगेश पाडगावकर म्हणतात - कसं जगायचं, हसत की रडत! हे ज्याचे त्याने ठरवायचं!'' तर स्वामी स्वरूपानंद सांगत 'जगाचा सगळा भार आपल्याच डोक्यावर आहे हे विसरून थोडा काळ तरी तो भार परमेश्वरावर आहे याचे स्मरण ठेवावे या पलिकडे आणखी काय सांगावे?


**- श्रीधर विश्वनाथ सहस्रबुद्धे**
९८२३२८५३९०

## Guest House at 'SHIRDI' - made available by SBI Officers' Association for Retired Officers ( Pensioner Officers)

**********************************

It is advised by S.B.I.Officers' Association (Mumbai Circle) that they have constructed their own Guest House at Shirdi named **"Sri Sai SBOA Bhavan, Shirdi"** which is ready and can be made available for stay for Officer members of SBI Officers' Association/Federation and Retired Officers (Pensioner Officers) **only**. The terms and conditions laid down for booking are given hereunder.

| | |
|---|---|
| **Name** | Sri Sai SBOA Bhavan, Shirdi (It's a three storey Building) |
| **Address** | 187/3 Plot No.8-9, Behind Hotel Pushpak Resort,<br>Shirdi-Ahmednagar Road, SHIRDI, Ahmednagar Dist. PIN - 423109 |
| **Name of Caretaker** | Shri.Chintaman Sable (Mobile - 09657508146) |
| **Facilities Available** | 8 fully furnished AC rooms with 3 star split ACs.<br>1 six-bedded fully furnished AC Dormitory.<br>32" LCD TVs in all rooms.<br>Cafeteria - only Vegetarian will be served on demand.<br>Lockers (electronic locks) for safe-keeping of valuables.<br>24 hours HOT water facility through Solar Water heaters.<br>Lift facility. Ample parking space.<br>Changing/rest rooms for Drivers. Travel Desk. |
| **Tariff** | a) Two Adults plus Two Children (below 12 years) Rs.500/- per room, per day. Extra person - Rs.100/- each.<br>b) Dormitory :- Rs.200/- per day per person **Or** for group booking (all six beds) - Rs.1000/- per day.<br>Drivers seeking the bedding will be charged Rs.100/- per night. |
| **For booking - PI contact** | The General Secretary, SBIOA (Mumbai Circle),<br>State Bank of India, "Synergy", Ground floor, Behind National Stock Exchange Bldg., Bandra-Kurla Complex, Bandra (E), Mumbai-400051<br>Tel.No.022-67514041 / 42 / 44; Fax No. 022-67514043.<br>e-mail : **sbioamumbai@gmail.com**<br>Booking is to be made in advance with full payment. Once the booking is confirmed by the Association HQs, members are requested to deposit the requisite amount in A/c No. 10996684505 with "no fees" tag. Members are requested to strictly carry their ID cards to avoid inconvenience.<br>Since this place (Shirdi) is blessed by Sai Baba, members are requested to maintain the sanctity of the place by avoiding consumption of tobacco, non-vegetarian food and alcohol.<br>Members from other Circles should send their requests for booking through their Association HQs. Direct requests will not be entertained.<br>The Guest House facility can be availed by members of all affiliates of All India state Bank Officers' Federation and **retired members of the affiliates.** |

# युनिट वार्ता

## वर्धा युनिट :

वर्धा जिल्हा युनिटची वार्षिक सर्वसाधारण सभा १९ फेब्रुवारी २०१२ रोजी बँकेच्या आवारात संपन्न झाली. ह्या सभेला नागपूर झोनल सब्सेंटरचे सचिव श्री.जयंत वकील आवर्जून उपस्थित होते. अध्यक्ष श्री.देसाई कांही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहू शकले नाहीत. ह्या सभेला वर्धा जिल्ह्यातील बहुतांश सभासद उपस्थित होते. बँकेचे चीफ मॅनेजर श्री.प्रमोदकुमार, पर्सोनेल डिपार्टमेंटचे मॅनेजर श्री.भागवतकर, तसेच वर्धा येथील दुसऱ्या शाखेचे चीफ मॅनेजर श्री.सोरटे हे सर्वजण विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

वर्धा युनिटचे सचिव श्री.रोटकर यांनी सर्वांचे स्वागत केल्यावर विशेष निमंत्रितांचा परिचय करून दिला. वर्धा युनिटचे ज्येष्ठ सदस्य श्री.झुनझुनवाला ह्यांचा, त्यांच्या वयाची ७५ वर्षे पूर्ण झाली म्हणून श्री.जयंत वकील यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. त्यानंतर २०११-१२ ह्या वर्षात ज्या सभासदांचे निधन झाले त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. नंतर सचिव श्री.रोटकर यांनी युनिटच्या गतवर्षाच्या कार्याचा आढावा घेऊन ज्या सभासदांनी युनिटची सदस्य संख्या वाढविण्यासाठी सहाय्य केले अशांचे आभार मानले. यामध्ये कार्यकारी मंडळाचे सदस्य व विशेषत: वर्धा युनिटचे अध्यक्ष श्री.दिक्षित यांचा सिंहाचा वाटा आहे. आतापर्यंत युनिटची सभासद संख्या २०० चे वर गेली आहे याचा आवर्जून उल्लेख केला. यानंतर सर्व आमंत्रित पाहुण्यांनी सभेला उद्बोधित केले व पेन्शनरांना यथायोग्य व त्वरित सहकार्य मिळेल असे आश्वासन मिळेल. श्री.वकील यांनी आपल्या भाषणात वर्धा युनिटच्या कार्याची मुक्तकंठाने स्तुती केली व सदस्यांच्या अडचणींचे निराकरण करण्याचे व प्रलंबित प्रकरणांचा पाठपुरावा करून निकाली लावण्याचे आश्वासन दिले. ह्यानंतर श्री.दिक्षित यांनी आभार प्रदर्शन केले. सहभोजनानंतर ही सभा संपन्न झाली.

- अ.दा.रोटकर, सचिव

******************

## अमरावती युनिट :

दि.२८ मार्च २०१२ रोजी अमरावती युनिटने सभासदांकरिता स्नेहसंमेलन अमरावती येथील हॉटेल 'महफिल इन' येथे सायंकाळी ५ ते रात्री ९ वाजेपर्यंत आयोजित केले होते. या दिवशी त्यावळेत बँकेच्या 'पेन्शनर्स मीट' चे सुद्धा आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान बँकेच्या अमरावती येथील क्षेत्रीय व्यवसाय कार्यालयाचे सहाय्यक महाप्रबंधक श्री. भास्कर मोतीखाये यांनी भूषविले होते. त्यांचे शुभहस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

गतवर्षात निधन झालेल्या सभासदांना, तसेच महाकवि 'ग्रेस' यांना मूक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर २८ मार्चला वाढदिवस असणारे सदस्य श्री.श्रीराम खजूरकर यांचे प्रमुख पाहुण्यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले. यानंतर अमृतमहोत्सवी वाटचाल पूर्ण करणारे सदस्य श्री.शरद्चंद्र जोशी व श्री.दिनकर नवसाळकर यांचा मा.अध्यक्ष श्री.मोतीखायेसाहेबांचे हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व मिठाई देऊन हार्दिक सत्कार करण्यात आला, तसेच सौ.सुनंदा जोशी व सौ.आशा नवसाळकर यांचासुद्धा सौ.रेखा निमदेव यांनी कुंकुमतिलक लावून व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर सचिव श्री.ज्ञानप्रकाश खोब्रागडे यांनी युनिटतर्फे या वर्षात करण्यात आलेल्या कार्याचा अहवाल थोडक्यात सादर केला. 'पेन्शनर्स मीट' अंतर्गत सचिव यांनी सहा.महाप्रबंधक श्री.मोतीखाये यांना सभासदांना येणाऱ्या अडचणींचे निवेदन केले. विशेषकरून 'लाइफ सर्टिफिकेट' व 'पॅन क्रमांक' बँकेला सादर करूनसुद्धा कार्यालयीन दिरंगाई वा संबंधित स्टाफच्या हलगर्जीपणामुळे बऱ्याच सभासदांना दोन महिन्याची पेन्शन न मिळाल्याने झालेल्या मनस्तापाबद्दल व गैरसोयीबद्दल चिंता व्यक्त केली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री.मोतीखायेसाहेबांनी सर्व निवृत्तीवेतनधारकांना आश्वस्त केले कीं, त्यांना कार्यालयीन कामात अडचण किंवा त्रास होऊ नये म्हणून त्याबाबत योग्य त्या सूचना सर्व शाखा व्यवस्थापकांना देण्यात येतात. यापुढेही सेवानिवृत्तांना सर्व प्रकारे सहकार्य देण्यासंबंधीच्या सूचना वेळोवेळी देण्यात येतील. त्याचबरोबर सेवानिवृत्तांचेही याबाबत सहकार्य मिळावे अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच पेन्शनर्स असोसिएशनचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांचे, ते करीत असलेल्या पेन्शनरांच्या हिताचे कार्याबद्दल कौतुक केले.

यानंतर मनोरंजन कार्यक्रमांतर्गत अमरावती येथील सोसायटी ऑफ इंडियन रेकॉर्डस्-कलेक्टर या संस्थेचे मानद सचिव श्री.अरविंद हंबर्डे यांच्या संग्रहातील दुर्मिळ सिनेसंगीताचा तसेच दिवंगत सिनेकलाकार श्री.शम्मी कपूर यांच्या मुलाखतीवर आधारीत गीत-संगिताचा ८० मिनिटांचा दृक्-श्राव्य कार्यक्रम सादर केला. त्यामुळे उपस्थितांच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. शेवटी श्री.अविनाश निमदेव यांनी आभार प्रदर्शन केले. स्वरुचि भोजनानंतर हा कार्यक्रम संपन्न झाला.

- ज्ञानप्रकाश खोब्रागडे, सचिव

****************

## यवतमाळ युनिट :

यवतमाळ जिल्ह्यातील सर्व सभासदांचे वार्षिक स्नेहसंमेलन यवतमाळ येथील मंजुषा मंगल कार्यालयात दि.२५ मार्च २०१२ रोजी संपन्न झाले. या संमेलनास विशेष अतिथि म्हणून माजी सहा.महाव्यवस्थापक श्री.यू.एम.राऊत, नागपूर झोनल सबसेंटरचे अध्यक्ष श्री.श्रीकांत देसाई व सचिव श्री.जयंत वकील, तसेच बँकेच्या रिजनल बिझिनेस ऑफिसचे चीफ मॅनेजर श्री.विजय पांढरकर, दत्तचौक (यवतमाळ) शाखेचे व्यवस्थापक श्री.रमेश प्रभाकर, वडगाव रोड (यवतमाळ) शाखेचे व्यवस्थापक श्री.आशिष गंजिवाले इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांचे हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन करून झाली. तसेच मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन

स्वागत करण्यात आले. त्यानंतर गतवर्षातील दिवंगत सभासदांना श्रद्धांजली वाहण्यात आली. गतवर्षातील नवीन सदस्यांचे मान्यवरांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर युनिटचे मावळते अध्यक्ष श्री.उदय देशपांडे यांनी प्रास्ताविक भाषण केले. युनिटचे सचिव श्री.गोपालकृष्ण गाडगे यांनी युनिटच्या गतवर्षातील कार्याचा अहवाल सादर करतांना सर्व सभासदांच्या सहभागाचा व सहकार्याचा आवर्जून उल्लेख केला.

त्यानंतर पंचाहत्तरीनिमित्त वणी येथील सदस्य श्री.प्यारेलालजी बिलगे यांचा अध्यक्ष श्री.यू.एम.राऊत यांचे हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन हार्दिक सत्कार करण्यात आला. तसेच पुसद येथील श्री.भेंडे यांचे 'आनंदयात्री' या कविता संग्रहाचे प्रकाशनाचे निमित्ताने श्री.पुंडलीकराव भेंडे व त्यांच्या सुविद्य पत्नि सौ.सीताताई यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्या प्रसंगी बोलतांना श्री.गाडगे म्हणाले कीं, अख्खे आयुष्य बँकेत आकड्यांचे संगतीत व पैशाच्या ढिगाऱ्यावर राहूनही शब्दांवर अधिराज्य त्यांनी गाजविल्याचे या कवितासंग्रहातील कविता वाचल्यावर जाणवल्याशिवाय रहात नाही. श्री.भेंडे हे सत्कारास उत्तर देतांना म्हणाले कीं आपले असोसिएशनच्या 'संवाद' मासिकातून कविता नियमित प्रसिद्ध झाल्यामुळे त्यांना प्रोत्साहन मिळत गेले. याप्रसंगी कांही कवितांचे त्यांनी अर्थवाही वाचन केले. प्रमुख पाहुण्यांपैकी श्री.विजय पांढरकर यांनी, या कार्यक्रमाला उपस्थित राहिल्याने व जुन्या मंडळींच्या झालेल्या भेटींमुळे अगदी आपल्या आप्तांमधेच आल्यासारखे जाणवले व त्यामुळे आनंद व समाधान झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

त्यानंतर नागपूर झोनल सब्-सेंटरचे अध्यक्ष श्री.श्रीकांत देसाई व सेक्रेटरी श्री.जयंत वकील यांनी सभेस संबोधित करून असोसिएशन स्तरावरील घडामोडींविषयी सविस्तर विवेचन केले. अध्यक्षीय भाषणात श्री.राऊत साहेबांनी कोणत्याही संघटनेत संघटित राहणे किती आवश्यक आहे हे सांगून बँकेच्या वरिष्ठ स्तरावरील कामे कशा प्रकारे सुरळीत होतात ह्याचाही परामर्श घेतला.

सहसचिव श्री.भोंबे यांनी आभार प्रदर्शन केल्यावर सहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. सभेतील अल्पोपहाराची/ भोजनाची व इतर व्यवस्था पार पाडण्यात सर्वश्री दत्तात्रय भोंबे, गोपालकृष्ण गाडगे, उमेश इनामदार, मोहन मोहदरकर इत्यादी कार्यकर्त्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सर्वश्री किरण पांडे, शरद्चंद्र हमिने ह्यांचे मार्गदर्शनाखाली कार्यक्रम उत्कृष्ठरित्या पार पडला. या कार्यक्रमाला जवळपास १०० सभासदांची उपस्थिती होती. यवतमाळ युनिटचे विद्यमान अध्यक्ष श्री.उदय देशपांडे यांनी वैयक्तिक कारणामुळे राजिनामा दिल्यामुळे त्यांचे जागी श्री.शरद्चंद्र हमिने यांची युनिटचे अध्यक्ष म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली.

गोपाळकृष्ण गाडगे, सचिव

****************

## नाशिक युनिट :

नाशिक जिल्ह्यातील सर्व सभासदांची सर्वसाधारण सभा दि.१६ मार्च २०१२ रोजी गद्रे मंगल कार्यालय, नाशिक येथे सायं. ४.३० ते ७.३० या वेळेत संपन्न झाली. एकूण २१५ सभासद उपस्थित होते. श्री.शाम भणगे यांनी शरणपूर रोड (नाशिक) शाखेचे शाखाधिकारी श्री.अनिल कुलकर्णी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर गतवर्षातील दिवंगत सभासदांची नांवे वाचल्यावर दोन मिनिटे उभे राहून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. श्री.शाम भणगे यांनी प्रास्ताविक केल्यावर नविन सभासदांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर श्री.भणगे यांनी गेल्या वर्षीच्या कामाचा अहवाल सादर केला. तसेच गेल्या वर्षीच्या एकूण जमा-खर्चाचा तपशील सादर करून त्यास सभेची मान्यता घेतली. यानंतर ज्या सभासदांनी वयाची पंचाहत्तरी पूर्ण केली अशांचा नाशिक युनिट तर्फे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन हार्दिक सत्कार करण्यात आला.

माधवबाग आयुर्वेदिक हृद्रोग निवारण केंद्राचे डॉ.प्रविण घाडीगावकर व डॉ.पवार यांना हृदय रोगासंबंधी उद्बोधन करण्यासाठी खास पाचारण करण्यात आले होते. त्यांनी आपल्या भाषणात केंद्राबद्दल माहिती सांगून हृदय रोगाचे निवारण कसे करावे, काय काळजी घ्यावी याबद्दल उपयुक्त माहिती सांगून मार्गदर्शन केले. त्याबद्दल त्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

नाशिक येथे बँकेची डिस्पेन्सरी चालू व्हावी यासाठी गेली कांही वर्षे नाशिक युनिटने खूप प्रयत्न व पाठपुरावा केला. अखेरीस त्याला यश येऊन कर्मचाऱ्यांसाठी व पेन्शनरांसाठी डिस्पेन्सरी सुरू झाली. या दवाखान्यात डॉ.मिलिंद शहा यांची नियुक्ती झाली आहे. त्यांची सर्व सभासदांना ओळख व्हावी म्हणून त्यांना खास निमंत्रण दिले होते. या सभेत त्यांना श्री.विसपुते यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. डॉ.शहा यांनी सर्व सभासदांना व कर्मचाऱ्यांना पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

सभासदांची एकूण संख्या लक्षांत घेतां आपली स्थानिक कार्यकारिणी असावी म्हणून त्यासाठी पुढील सभासदांची निवड करण्यात आली. सर्वश्री दिलीप सांगळे, प्रकाश देशमुख, जे.एन.तोरणे, चंद्रशेखर गाडगीळ, विनोद शुक्ल, दिनेश बच्छाव, सतीश गायकवाड, राजा पटवर्धन, भीमसिंग ठाकूर व विकास खरे.

सभेचे प्रायोजक श्री.अनिल कुलकर्णी, शाखाधिकारी, शरणपूर रोड शाखा, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सभासदांची मोठ्या प्रमाणावरील उपस्थिती पाहून सर्वांचे कौतुक केले. श्री.सांगळे यांनी सभासदांची माहिती अद्ययावत ठेवण्याचे आवाहन केले. शेवटी श्री.जयप्रकाश तोरणे यांनी सर्वांचे आभार मानले. सभेचे सूत्रसंचालन श्री.विसपुते यांनी केले. सभेची सांगता अल्पोपहार व चहापानाने झाली.

शाम भणगे, सचिव

****************

## State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle) Pune
## Nagpur Zonal Sub Centre

Elections for electing the **office bearers of Nagpur Zonal Sub-centre** were scheduled on 27th May 2012. However after the withdrawal of nominations by the respective candidates **the following members have been elected unopposed.** The official announcement of their election will however be made by Shri A.G.Deshpande, Election Officer on 27th May 2012 in the Annual General Body Meeting.

| Name of the Post | Name of the elected Candidate |
|---|---|
| President | Shri V.D.Deshpande (Nagpur) |
| Vice-President | Shri Nilkanth Nagraj (Akola) |
| Secretary | Shri Sudhir Agrekar (Nagpur) |
| Joint Secretary | Shri D.B.Khobragade (Amravati) |
| Treasurer | Shri A.P.Walokar (Nagpur) |

Apart from the above elected representatives, the Secretary of each District Unit Will be a member of the Zonal Sub Centre committee.

J.S.Vakil
Secretary

*****************************************************************************

## Nagpur Zonal Sub-Centre
## Results of Elections for Nagpur Unit

Elections for forming the **Nagpur Unit** of State Bank of India Pensioners' Association **consisting Districts of Nagpur, Bhandara, Chandrapur, Gadchiroli & Gondia** were conducted on 22nd April 2012 at Nagpur as scheduled. The following are the details of the votes polled by the respective candidates.

| Name of the Post | Name of the Contestant | No. of Votes Polled | Result |
|---|---|---|---|
| **President** | Shri J.R.Khekhale | 29 | |
| | Shri Vijay B. Gadkari | 62 | |
| | **Shri Prakash B. Badge............** | **165** | ...................... Elected |
| **Vice-President** | Shri H.N.Wanaskar | 48 | |
| | **Shri D.B.Deshmukh ..............** | **207** | .................... Elected |
| **Secretary** | Shri J.R.Khekhale | 108 | |
| | **Shri V.M.Jagdale ...................** | **150** | ..................... Elected |
| **Joint Secretary** | Shri M.N.Udawant | 60 | |
| | **Shri D.M.Godbole .................** | **201** | ....................... Elected |
| **Treasurer** | **Shri N.A.Diore ......................** | **150** | ...................... Elected |
| | Shri A.S.Punekar | 108 | |
| | **Committee Members** | | |
| | **Shri T.G.Meshram ..................** | **185** | ........................ Elected |
| | **Shri L.G.Gautam .................** | **206** | ....................... Elected |
| | Shri V.S.Phadke | 177 | |
| | **Shri M.B.Gupte .....................** | **234** | ..................... Elected |
| | **Shri M.S.Tonge .....................** | **182** | ...................... Elected |

J.S.Vakil
Secretary

## पुणे झोनल सब्सेंटर :

अनेक दिवसांच्या आपल्या स्थानिक कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांमुळे व झोनल ऑफिस व हेड ऑफिस स्तरावरील केलेल्या पाठपुराव्यांमुळे नाशिक व पुणे येथील खालील शाखांमध्ये बँकेचे दवाखाने (Dispensaries) सुरू झाले आहेत याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी. तसेच पुणे येथील SPPB (Deccan Gymkhana) शाखेतील दवाखान्यात डॉक्टरांची नेमणूक झाली आहे व तो दवाखाना सुरू झाला आहे. वरील दवाखान्यांच्या वेळा खालीलप्रमाणे आहेत.

| | ओल्ड आग्रारोड नाशिक | पौंडरोड पुणे | एस्.पी.बी.बी.पुणे |
|---|---|---|---|
| पुढील दिवशी ) - चालू राहील ) - | मंगळवार, गुरूवार व शनिवार | सोमवार, बुधवार व शुक्रवार | आठवड्याचे सर्व कामकाजाचे दिवशी |
| वेळा | दुपारी ४ ते ६ | दुपारी ४ ते ६ | सोम.ते शुक्र. दुपारी १२ ते ४<br>शनिवारी दु. १२ ते २ |
| नियुक्त डॉक्टर - | डॉ. मिलिंद शहा | डॉ. वृषाली नाईक | डॉ. विजया दाते |

झोनल ऑफिस पुणे यांनी नुकतेच पुण्यातील कांही शाखांचे कामाचे व सुटीचे दिवस बदलले आहेत. तरी सभासदांनी बदलेल्या दिवसांची माहिती व दवाखान्यांचे वेळापत्रक बदलले असल्यास त्याची माहिती संबंधित शाखाधिकाऱ्यांकडून अगर झोनल ऑफिसमधील पर्सोनल विभागाकडून घ्यावी ही विनंती.

***- सचिव, पुणे विभाग***

## ठाणे-मुलुंड सांस्कृतिक मंडळ

ठाणे-मुलुंड सांस्कृतिक मंडळातर्फे **शनिवार दि. २३ जून २०१२ रोजी सायंकाळी ५ ।। वाजता** श्री.शशिकांत लावणीस व त्यांचे सहकारी विविध करमणुकीचा कार्यक्रम सादर करणार आहेत. हा कार्यक्रम **ठाणे येथील (जिल्हा परिषदेच्या कार्यालया समोरील) मराठी ग्रंथालयाच्या 'सरस्वती सभागृहात'** आयोजित केला आहे. तरी सर्व सभासदांनी सहकुटुंब सहपरिवार उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा ही विनंती.

तसेच आपल्या सांस्कृतिक मंडळाच्या कार्यकारी मंडळाची पुढीलप्रमाणे पुनर्रचना झाली आहे याची कृपया नोंद घ्यावी.

| | | | |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | श्री.अरविंद दिवेकर | ९८७००१२०२० | / २५८२३०४५ |
| सचिव | श्री.वसंत कर्वे | ९८२०८८४७३५ | / २५४०६६०१ |
| सह सचिव | सौ.भारती गद्रे | ९७५७२९०११७ | / २८४०२०३६ |
| खजिनदार | सौ.सुलभा अरोसकर | ९९६७१७९८७० | / २५४०७५१० |
| सभासद | श्रीमती ज्योती शहाण | ९८६९२५५०२१ | / २५४२५०२१ |
| सभासद | श्री.वसंत कान्हेरे | - | / २५४३०६९० |

**- वसंत कर्वे, सचिव**

## अनुकरणीय

आपले नाशिक येथील सभासद श्री.देविदास ऊर्फ बापू जोशी ह्यांच्या पत्नी सौ.मीनाताई जोशी यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी दु:खद निधन झाले. श्री.बापू जोशी यांनी नाशिक येथील 'सक्षम' (म्हणजे **स**मदृष्टी, **क्ष**मता विकास एवम् अनुसंधान **म**ंडल) या विकलांगांसाठी कार्यरत असलेल्या आणि स्टेट बँक तसेच इतर राष्ट्रीयीकृत बँकांच्या सेवानिवृत्तांनी कार्यप्रवण ठेवलेल्या संस्थेमार्फत कै.सौ.मीनाताईंचे अंतिम इच्छेनुसार 'नेत्रदान' करून जोशी कुटुंबीयांनी सामाजिक जाणीव अधोरेखित केली आहे. हे सत्कार्य निश्चितच अनुकरणीय आहे.

**- सेक्रेटरी**

# District-wise Alphabetical List of Members admitted

(Kindly refer earlier List published in SAMVAD for September 2011)

****************************************************

**AKOLA**

PM/10678 MR.DILIP K.DESHPANDE
PM/10720 MR.JAYANT G. SONAK
PM/10817 MR. RAMESH RAMPRATAP KATTA
PM/10834 MR. PRABHUDAS S. RODE

**AMRAVATI**

PM/10647 HARISHCHANDRA R.AADHE
PM/10684 MR.PRABHAKAR U.SONKUSARE
PM/10685 MR.DNYANESHWAR R.SHEREKAR
PM/10740 MR. BAKARAM L. KUKADE
PM/10687 MR.ANIL RUPRAO BHATKULE
PM/10686 MR.ANIL K.JOSHI

**AURANGABAD**

PM/10737 MR. PANDHARINATH V. DIGHULE
PM/10738 MR. VISHNU A. SONGIRE
PM/10850 MR.NANDLAL G. KHANDELWAL

**BELGAUM**

PM/10794 MR.ASHOK GANPATLAL KAYASTHA

**BULDANA**

PM/10679 MR.SHRIKRISHNA G.KULKARNI
PM/10645 MR.ISHWARDAS L. WAKODE
PM/10718 MR.SHALIGRAM K. SHEGOKAR
PM/10818 MR. PRABHAKAR FAKIRA AMBHORE

**CHANDRAPUR**

PM/10691 MRS.SHANTA RAMDAS TAKSNDE
PM/10692 MR.PUNDLIK B.NANDURKAR
PM/10714 MR.ASOK K. KULMETHE

**DHULE**

PM/10755 MR. YASHWANT A. NIKUMBHE
PM/10819 MR. UDAY SHANKAR KULKARNI
PM/10849 MR.SURESH R. SALI

**DOMBIVALI**

PM/10751 MRS. VARSHA SANDEEP VAIDYA
PM/10843 MRS.SHUBHANGI SUDHIR BHAVE

**DUNGARPUR**

BM/10667 MR.HRIRAM RATANJI VYAS

**GOA**

BM/10666 SMT.SHOBHAVATI NAIK
PM/10731 MR.MENINO FURTADO
PM/10733 MRS.HEERA PRAKASH KHARANGATE
PM/10734 MR.DHRUVAKUMAR U. SAWARDEKAR
PM/10765 MRS. FATIMA S. VAZ
PM/10804 MR. PRAKASH B. KUNDALKAR
PM/10805 MR. LAXMAN G. VASTA
PM/10833 MRS. MARIA L. REBELO

**GONDIA**

PM/10719 MR.NAMDEO RAJARAM GANGBHOJ

**JALGAON**

BM/10668 MR.VISHWAS SHRIDHAR PATIL
PM/10707 MR.VISHWANATH C.JADHAV
PM/10775 MR. SURESH K. PATIL
PM/10776 MR. DHANANJAY B. MULEY
BM/10736 MR. ABDUL RASHID SHAIKH

**KOLHAPUR**

PM/10652 MRS.MEENA HARISH BHALERAO
PM/10660 MR.ASHOK NARSU GHADGE
PM/10661 MR.ARJUN GANPAT SATHE
PM/10693 MRS.ARUNDHATI A.MARATHE
PM/10653 MR.PRABHAKAR K.KAMBLE
PM/10657 MR.BALASAHEB S.LAD

**MUMBAI**

PM/10654 MR.OMPRAKASH B.SHARMA
PM/10664 MR.RAMDAS B.KANDALGAONKAR
PM/10665 MR.PREEP DAMODAR DESHPANDE
PM/10701 MR.SHANTARAM S.VEDAK
PM/10703 MR.ANESH R.RANE
PM/10705 MR.SUDHIR V.KANADE
PM/10709 MRS.PRATIBHA ASHOK PAI
PM/10710 MR.VISHWAS P. DAWALKAR
PM/10711 MR.HAZEL J. FERNANDES
PM/10712 MR.NANDKUMAR D. LAD
PM/10727 MR.YASHWANT TUKARAM RAUT
PM/10728 MRS. NISHIGANDHA S. LELE
PM/10729 MRS.RAJU RAJESHKUMAR SRIVASTAVA
PM/10742 MR. RAVIKUMAR C. PODUWAL
PM/10743 MR.DURYODHAN K. KHOBRAGADE
PM/10745 MR.SUDHIR K. CHAVAN
PM/10747 MR. VISHWAS J. VARTAK
PM/10748 MR.SATISH SURAJMAL BORA
PM/10749 MR. SURESH KRISHNA CHAVAN
PM/10750 MR. RAMESH K. TRILOKEKAR
PM/10778 MRS. DEEPA PRAKASH ADUR
PM/10779 MR. MAHESH SHIRODKAR
PM/10780 MRS.ARCHANA GORA GHATAK
PM/10781 MR.SIDDHARTHRAJ SAHGAL
PM/10783 MR. CHANDRAKANT D. JOSHI
PM/10788 MR.SADASHIV TRIMBAK KALE
PM/10789 MR. SHRIKANT M. NAGWEKAR
PM/10790 MR.JAGDISH G. KHAMKAR
PM/10791 MR. KAILAS A. GARUD
PM/10792 MR. DILIP ATMARAM SAWANT
PM/10795 MR.HARISHCHANDRA JAMBURGEKAR
PM/10797 MR. RATAN SHANKAR DHAR
PM/10799 MRS. URMILA B. ATHALYE
PM/10800 MR. VIJAYKUMAR P. NAIK
PM/10803 MR. MADHUKAR DAMODAR PATIL
PM/10823 MR.MUKUND R. KULKARNI
PM/10824 MR.PRAKASH RAJARAM PAWAR
PM/10825 MR. RAMCHANDRA SAHDEO SHINDE
PM/10826 MR. NAGESH S. PRABHU

PM/10827 MR. SHABBIR TAHERALI TAJ
PM/10828 MR.ACHUT K. SATARDEKAR
PM/10829 MR.SHRIDHAR L. RASAM
PM/10830 MRS.ANJANI P. GHODKE
PM/10836 MR. GIRISH V. PADHYE
PM/10837 MRS. SMITA S. MHATRE
PM/10838 MRS. GAURI PRAKASH DALVI
PM/10839 MR. SURESH SAHADEO KATKADE
PM/10840 MR. VIJAY KUMAR SHARMA
PM/10841 MRS. JAYMATI J. TALPADE
PM/10845 MR.ASHOK V. SAWANT
PM/10846 MR. VINAYAK S. PATANKAR
PM/10847 MR.PRABHAKAR B. DALVI
BM/10848 MR. GAJANAN BAPU SAKPAL
PM/10655 MR.ASHOK KUMAR AGRAWAL
PM/10784 MR.SATISHKUKMAR S. CHITRE

**NAGPUR**

PM/10648 MR.DHANANJAY B.DESHMUKH
PM/10649 MR.SUDHIR B.DESHPABDE
PM/10650 MR.RAMESH P.DESHPANDE
PM/10671 MR.N.NARAYANAN
PM/10672 MR.DHANANJAY M.GODBOLE
PM/10673 MR.PRAKASH DINKAR KHARE
PM/10674 MR.JAYANT NARAYAN KAWARE
PM/10675 MR.MANOHAR W.RAMTEKKAR
PM/10676 MR.ABHAY T.KAWALE
PM/10680 MR.CHINTAMANI Y.NIMJE
PM/10681 MR.SUDHAKAR D.BANSOD
PM/10682 MR.SURESH T.MATADE
PM/10683 MR.PURUSHOTTAM L.DHANTALE
PM/10688 MR.RAMCHANDRA S.ATEY
PM/10689 MR.GHANSHYAM M.PILLEWAR
PM/10715 MR.SHRIKANT D. LAPALIKAR
PM/10716 MR.ANIL K. BHAGAT
PM/10717 MR.ATMARAM B. GODBOLE
PM/10739 MR.PANJABRAO G. MESHRAM
PM/10741 MR.PRAKASH B. BADGE
PM/10758 MR. DILIP P. KHADSON
PM/10808 MR.HARISHCHANDRAA. GUNDAWAR
PM/10806 MR. SUDHIR M. AGREKAR
PM/10811 MR. RAMESH G.WARAMBHE
PM/10812 MR. JAYAJI T. SALVE
PM/10813 MR. PANDURANG N. GHODESHWAR
PM/10816 MR. RAJA EKNATH DHOLE
PM/10835 MR.GAOPAL SHRIRAM BAND
PM/10807 MR.SHRINIWAS G. PARKHI
PM/10670 MR.RAJARAM G.SATPUTE

**NANDURBAR**

PM/10753 MR. UDAYSING SUNDER CHAVAN
PM/10754 MR. SHARADKUMAR V. TILWANKAR

**NASHIK**

PM/10659 MR.SANJAY S.KULKARNI
PM/10726 MR.ASHOK LAXMAN KULKARNI
PM/10760 MR.ANIL R. BHARGAVE
PM/10761 MR.SADANAND BHAGWAN JOSHI
PM/10762 MR. BHAGIRATH KASIRAM KATHE
PM/10787 MR. PRAKASH RAMDAS WARUDE
PM/10658 MR.BRMHAGIR KISAN GOSWAMI
PM/10725 MR. KESHAV DIWAKAR SHERIKAR
PM/10766 MR. UTTAM RANGNATH NIKAM
PM/10774 MR. PRAKASH NARAYAN DESHPANDE

**OSMANABAD**

PM/10656 MR.ASHOK D.THOMBRE

**PUNE**

PM/10644 MR.SHARAD SHARANGDHAR DANDE
PM/10651 MR.VASUDEO C.BHAGWAT
PM/10669 MR.SHRIKRISHNA R.DESHPANDE
PM/10695 MR.SANJAY Y.NADKARNI
PM/10696 SMT.SHEELA R.DESHPANDE
PM/10697 MRS.RATNA N.PATIL
PM/10698 MR.K.H.KRISHNAMURTI
PM/10723 MR. ALPHONSO A. ALBUQERQUE
PM/10723 MR.BABAN BAURAO KHANDARE
PM/10735 MR.SATISH S. SHUKLA
PM/10763 MR. RAVINDRANATH V. BOKHARE
PM/10767 MR. VISHWANTH G. GODBOLE
PM/10768 MR. AJAY SHANKAR DEOLE
PM/10769 MR.PANDURANG DADU PAWAR
PM/10777 MR. TUSHAR D. PATIL
PM/10782 MR.CHANDRASHEKHAR B. SAWANT
PM/10798 MR. ASHOK B. GAITONDE
PM/10801 MRS. JYOTI J. JATAHR
PM/10809 MR. VINAYAK N. JOSHI
PM/10810 MR.PRAKASH S. BOKIL
PM/10820 MR. RAVINDRA NARHAR THAKAR
PM/10831 MR.SURESH S. PATIL
PM/10643 MR.SUDHAKAR GOPAL GHUNDRE

**RAIGAD**

PM/10752 MR. SUMANGAL K. PARANJAPE

**RATNAGIRI**

BM/10732 MR.SHANTARAM RAVJI KAMBLE

**SANGLI**

PM/10771 MR. NANDKUMAR B. TAMHANKAR
PM/10772 MR.SURESH SHRIDHAR CHHATRE
PM/10773 MR.ASHOK L. HALMANYAR
PM/10770 MR.SHARAD G. JOSHI

**SATARA**

PM/10832 MR. CHANDRASEN P. BARGE

**SINDHUDURG**

PM/10642 MR.RAGHUNATH KRISNA KAMBLE
PM/10764 MR. MOHAN JAIRAM SAMANT

**SOLAPUR**

PM/10662 MR.PRAKASH P.BORADE
PM/10699 MR.LAXMAN BHUMAYYA BUKKA
PM/10700 MR.DASHRATH L.BANSODE
PM/10821 SMT. MANGALA P. KAMBLE

PM/10663 MR.LAXMAN BABU DHAINJE
PM/10694 MR.BHARAT GOVIND FAWADE
PM/10730 MR.VILAS VITHOBA SURYAGAN
PM/10822 MR. ASHOK R. SATVEKAR

**THANE**

PM/10746 MRS.SANDHYA VIJAY GUPTE
PM/10786 MR. JAYAWANT K. PATIL
PM/10793 MR. YESHWANT S. KADUSKAR
PM/10796 MRS. ASHWINI ANIL KARNIK
PM/10802 MR.SADANAND V. KHAMKAR
PM/10842 MRS. MEGHA MILIND JOSHI
PM/10708 MR.ARUN Y.AMBARDEKAR
PM/10713 MR.VILAS J. TAWATE
PM/10844 MR. JAGANNATH D. TARE
PM/10702 MR.DAMODAR R.SAWANT
PM/10704 MR.ULHAS C.VYAVAHARKAR
PM/10706 MR.N.K.RAMTEKE
PM/10744 MR.BHIMRAO P. DANI
PM/10785 MR.ASHOK D. MASURKAR

**WARDHA**

PM/10646 MR.GOPAL GOVINDRAO MORE
PM/10759 MR. SHRAVAN K. KAMBLE
PM/10815 MR. LAXMAN PUNAJI DHANVIJ
PM/10690 MR.ASHOK B.SHRIRAMWAR
PM/10814 MR. BHAGWANGIR D. GIRI

**WASHIM**

PM/10721 MR. MAHADEO Y. MANWAR

**YAVATMAL**

PM/10677 MR.RAMESH H.KHOBRAGADE
PM/10756 MR.ARUN V. GALGALIKAR
PM/10757 MR.SHANKAR BABURAOJI BHAGAT
PM/10722 MR. BABAN V. MUPPIDWAR

## Associate Members

**AKOLA**

APM/9352 MRS. VAISHALI D. DESHPANDE
APM/9476 MRS. DARSHANA R. KATTA
APM/9494 MRS.PADMA P. RODE

**AMRAVATI**

APM/9324 MRS.SAGAR H. AADHE
APM/9357 MRS. SUREKHA P. SONKUSARE
APM/9358 MRS. ASHA D. SHEREKAR
APM/9404 MRS. ASHALATA B. KUKADE
APM/9360 MRS.CHHAYA A. BHATKULE
APM/9359 MRS.MEENAKSHI A. JOSHI

**AURANGABAD**

APM/9401 MRS. VIMAL P. DIGHULE
APM/9402 MRS. SUNANDA V. SONGIRE
APM/9510 MRS.LEELABAI N. KHANDELWAL

**BULDANA**

APM/9353 MRS. SEEMA S. KULKARNI
APM/9387 MRS.VIDYA S. SHEGOKAR

**CHANDRAPUR**

APM/9364 MR. RAMDAS S. TAKSANDE
APM/9365 MRS. VAISHALI P. NANDURKAR
APM/9383 MRS. NILIMA A. KULMETHE

**DHULE**

APM/9419 MRS. ASHA Y. NIKUMBHE
APM/9477 MRS.MRUNAL U.KULKARNI
APM/9509 MRS. KALPANA S. SALI

**DOMBIVALI**

APM/9415 MR. SANDEEP V. VAIDYA
APM/9503 MR.SUDHIR S. BHAVE

**DUNGARPUR**

ABM/9340 MRS.NARMADABAI H. VYAS

**GOA**

APM/9397 MRS. MARIA J.E. FURTADO
APM/9398 MR.PRAKASH G. KHARANGATE
APM/9429 MR. SAVIO S. VAZ
APM/9464 MRS. SHIVAM L. VASTA
APM/9493 MR.IVAN J.A.D.REBELO

**GONDIA**

APM/9388 MRS. KALAVATI N. GANGBHOJ

**JALGAON**

ABM/9341 MRS. SHOBHA V. PATIL
APM/9378 MRS. VANDANA V. JADHAV
APM/9438 MRS. BHARATI S. PATIL
APM/9439 MRS. VASNTI D. MULEY
APM/9400 MRS. NOORJEHANBI A.R. SHAIKH

**KOLHAPUR**

APM/9329 MR.HARISH M. BHALEREAO
APM/9335 MRS. MAYA A. GHADGE
APM/9366 MR.ARUN B. MARATHE
APM/9332 MRS,MADHRANI B. LAD

**MUMBAI**

APM/9330 MRS.MADHU O. SHARMA
APM/9338 MRS. USHA R. KANDALGAONKAR
APM/9339 MRS. RUCHIRA P. DESHPANDE
APM/9372 MRS.SMITA S. VEDAK
APM/9374 MRS. ASMITA A. RANE
APM/9376 MRS. SNEHAL S. KANADE
APM/9380 MR.ASHOK N. PAI
APM/9381 MRS.ASHA V. DAWALKAR
APM/9394 MR.SHARAD P. LELE
APM/9395 MR. RAJESH KUMAR SRIVASTAVA
APM/9406 MRS. ANURADHA R. PODUWAL
APM/9407 MRS. ASHA D. KHOBRAGADE
APM/9409 MRS.SUPRIYA S. CHAVAN
APM/9411 MRS. VIJAYA V. VARTAK
APM/9412 MRS. HEMA S. BORA
APM/9413 SHARMILA S. CHAVAN
APM/9414 MRS. MUGDHA R. TRILOKEKAR
APM/9441 MR. PRAKASH R. ADUR
APM/9442 MR. GORA N. GHATAK
APM/9444 MRS.ARCHANA C. JOSHI
APM/9449 MRS.SANJIVANI S. KALE
APM/9450 MRS. SMITA S. NAGWEKAR

APM/9451 MRS.NIRMALA J. KHAMKAR
APM/9452 MRS. PADMAVATI K. GARUD
APM/9453 MRS. DEEPALI D. SAWANT
APM/9455 MRS.MANISHA JAMBURGEKAR
APM/9457 MRS.ANJANA R. DHAR
APM/9459 MR.B.M.ATHALYE
APM/9460 MRS.SANTHI V. NAIK
APM/9463 MRS. KALAVATI M. PATIL
APM/9481 MRS.AUNURADHA M. KULKARNI
APM/9482 MRS. POONAM P. PAWAR
APM/9484 MRS.SHAILAJA R. SHINDE
APM/9485 MRS.NEHA N. PRABHU
APM/9486 MRS.NAFISA S. TAJ
APM/9487 MRS.SNEHAL A. SATARDEKAR
APM/9488 MRS. SMITA S. RASAM
APM/9490 MR.PURSHOTTAM T. GHODKE
APM/9496 MRS.ASMITA G. PADHYE
APM/9497 MR. SADANAND MHATRE
APM/9498 MR.PRAKASH K. DALVI
APM/9499 MRS. SHRUTI S. KATKADE
APM/9500 MR.JAYAPAL J. TALPADE
APM/9505 MRS.AMITA A. SAWANT
APM/9506 MRS.VIDYA V. PATANKAR
APM/9507 MRS.SARITA BP. DALVI
ABM/9508 MRS.SARASWATI G. SAKPAL
APM/9445 MRS.SMITA S. CHITRE

**NAGPUR**

APM/9325 MRS.BHAGYASHREE DESHMUKH
APM/9326 MRS. SUPARNA S. DESHPANDE
APM/9327 MRS. ANURADHA R. DESHPANDE
APM/9344 MRS.JAYANTHI NARAYANAN
APM/9345 MRS.DHANSHRRI D. GODBOLE
APM/9346 DR.(MRS.) SMITA P. KHARE
APM/9347 MRS. MADHURI J. KAWARE
APM/9348 MRS.HEMLATA M. RAMTEKKAR
APM/9349 MRS. VIBHA A. KAWALE
APM/9354 MRS. SULOCHANA C. NIMJE
APM/9355 MRS. SMITA S. MATADE
APM/9356 MRS. ALKA P. DHANTALE
APM/9361 MRS.ASHA R. ATEY
APM/9362 NRS.KALPANA G. PILLEWAR
APM/9384 MRS.SMITA S. LAPALIAKR
APM/9385 MRS. ARCHANA A.BHAGAT
APM/9386 MRS. SAROJ GODBOLE
APM/9403 MRS.CHANDRAKANTA MESHRAM
APM/9405 MRS.CHARULATA P. BADGE
APM/9422 MRS. DIPALI D. KHADSON
APM/9467 MRS. PUSHPA H. GUNDAWAR
APM/9465 MRS. VEENA S. AGREKAR
APM/9470 MRS. PRTIBHA R. WARAMBHE
APM/9471 MRS.KAMAL J. SALVE
APM/9472 MRS. MANGALA GHODESHWAR
APM/9475 MRS, ARUNA RAJA DHOLE
APM/9495 MRS.VEENA G. BAND
APM/9466 MRS.LAXMI S. PARKHI
APM/9343 MRS. KUSUM R. SATPUTE

**NANDURBAR**

APM/9417 MRS.ASHABAI U. CHAVAN
APM/9418 MRS.SNEHLATA S. TILWANKAR

**NASHIK**

APM/9334 MRS. SWATI S. KULKARNI
APM/9393 MRS.MANGALA A. KULKARNI
APM/9424 MRS. MADHURA A. BHARGAVE
APM/9425 MRS.HEMANGINI S. JOSHI
APM/9426 MRS. MUKTAI B. KATHE
APM/9448 MRS.PRATIKSHA P. WARUDE
APM/9333 MRS. NIRMALA B. GOSWAMI
APM/9392 MRS.SNEHAL D. SHERIKAR
APM/9430 MRS.MANDA U. NIKAM
APM/9437 MR. PRATIBHA P. DESHPANDE

**OSMANABAD**

APM/9331 MRS. MANISHA A. THOMBRE

**PUNE**

APM/9323 MRS.PRATIBHA S. DANDE
APM/9328 MRS. NANDINI V. BHAGWAT
APM/9342 MRS.SWATI S. DESHPANDE
APM/9368 MRS.SANJAN S. NADKARNI
APM/9369 MR. NISHIKANT D. PATIL
APM/9391 MRS. KALAVATI B. KHANDARE
APM/9399 MRS. SHAILJA SHUKLA
APM/9427 MRS. ANURADHA R. BOKHARE
APM/9431 MRS. PRADNYA V. GODBOLE
APM/9432 MRS. ANUYA A. DEOLE
APM/9433 MRS.ANITA P. PAWAR
APM/9440 MRS. TEJASWITA T. PATIL
APM/9443 MRS.SHILPA C. SAWANT
APM/9458 MRS. SABITA A. GAITONDE
APM/9461 MR.JANARDAN J. JATHAR
APM/9468 MRS.MEGHANA V. JOSHI
APM/9469 MRS. ANURADHA P. BOKIL
APM/9478 MRS. URMILA R. THAKAR
APM/9491 MRS.MILAN S. PATIL
APM/9322 MRS. SUSHILA S. GHUNDRE

**RAIGAD**

APM/9416 MRS. SHARMILA S. PARANJAPE

**SANGLI**

APM/9435 MRS.NEELA N. TAMHANKAR
APM/9436 MRS.SUJATA BS. CHHATRE
APM/9434 MRS. LATA S. JOSHI

**SATARA**

APM/9492 MRS.CHHAYA C. BARGE

**SINDHUDURG**

APM/9321 MRS.SHANTA R. KAMBLE
APM/9428 MRS.VRISHALI M. SAMANT

**SOLAPUR**

APM/9336 MRS.SHARDA PRAKASH BORADE

APM/9370 MRS.KRISHNAVENI L. BUCCA
APM/9371 MRS. SHARDA D. BANSODE
APM/9479 MR.PRAKASH M. KAMBLE
APM/9337 MRS.URMILA L. DHAINJE
APM/9367 MRS.NANDA B. FAWADE
APM/9396 MRS. VARSHA V. SURYAGAN
APM/9480 MRS. AP[ARNA A. SATVEKAR

**THANE**

APM/9410 MR. VIJAY Y. GUPTE
APM/9447 DR. MRS.JASMIN J. PATIL
APM/9454 MRS, SUMITRA Y. KADUSKAR
APM/9456 MR.ANIL J. KARNIK
APM/9462 MRS.SANDHYA S. KHAMKAR
APM/9502 MR. MILIND K. JOSHI
APM/9379 MRS. UMA A. AMBARDEKAR
APM/9382 MRS. VIDYA V. TAWATE
APM/9483 MR.V. KANNAN
APM/9504 MR.KALPANA J. TARE
APM/9373 MRS.ANJALI D. SAWANT
APM/9375 MRS. ANJU U. VYAVAHARKAR
APM/9377 MRS.Y.N. RAMTEKE
APM/9408 MRS. KALPANA B. DANI
APM/9446 MRS. SUPRIYA A. MASURKAR

**WARDHA**

APM/9423 MRS.KUNJANA S. KAMBLE
APM/9474 MRS. KANHOPATRA L. DHANVIJ
APM/9363 MRS.USHA A. SHRIRAMWAR
APM/9473 MRS. SUMITRA B. GIRI

**WASHIM**

APM/9389 MRS. RADHABAI M. MANWAR

**YAVATMAL**

APM/9350 MRS. RUPA R. KHOBRAGADE
APM/9420 MRS.ASHWINI A. GALGALIKAR
APM/9421 MRS. KIRAN S. BHAGAT
APM/9351 MRS. SUNANDA P. GADDAMWAR
APM/9390 MRS. PUSHPATAI B. MUPPIDWAR

## Family Pensioner Members

**AMRAVATI**

FPPM/1089 SMT.SHUBHANGI S.CHINCHORKAR

**BULDANA**

FPPM/1085 SMT.ANITA V.KAPALE
FPPM/1088 SMT.ASHA D.MANKAR

**KOLHAPUR**

FPBM/1083 SMT.URMILA B.GHATE

**PUNE**

FPPM/1087 SMT.SHOBHANA V.KHIRE

**SOLAPUR**

FPPM/1086 MR.ARUN D.JOSHI

**WARDHA**

FPBM/1084 SMT.JYOTSNA P CHATURVEDI

## COMMANDMENTS TO FOIIOW IN LIFE AII THE TIME !

1. Prayer is not a"Spare wheel" that you pull out when in trouble; it is a 'Steering wheel" that directs us in the right path throughout life.
2. Do you know why a car's WINDSHIELD is so large and the rear view mirror is so small? Because our PAST is not as important as our FUTURE. So look ahead and move on.
3. Friendship is like a BOOK. It takes few seconds to burn, but it takes years to write.
4. All things in life are temporary. Ifgoing well enjoy it, they will not last forever. If going wrong don't worry, they can't last long either.
5. Old friends are like Gold ! New friends are Diamonds ! If you get a Diamond, don't forget the Gold ! Because to hold a Diamond, you always need a bar of Gold.
6. Often when we lose hope and think this is the end. God smiles !rom above and says, "Relax,. sweet heart it is just a bend, not the end."
7. When GOD solves your problems, you have faith in His ability; when GOD does'nt solve your problems HE has faith in your abilities.
8. A blind person asked St. Anthony: can there be anything worse than losing eye sight? He replied: "Yes, losing your vision".
9. When you pray for others, God listens to you and blesses them; sometimes, when you are safe and happy, remember that someone has prayed for you.
10. Worrying does not take away tomorrow's troubles. It takes away to day's PEACE.

***- Collection by : N. Sethuraman, Bangalore***

( Courtesy - "S.B.I.Pensioners' Mail", February 2012 issue of monthly magazine of Pensioners' Association, Chandigarh Circle)

**सभासद मित्रहो,**

आपण 'संवाद' च्या फेब्रुवारी २०१२ च्या अंकात पान ९ वर 'युनीट वार्ता' या सदरांत वाचले असेल की, आपल्या सातारा युनीटचे अध्यक्ष श्री.एस.एस.देशपांडे यांनी आपल्या AGM नंतरचा श्रमभोजनाचा कार्यक्रम मोठ्या कल्पकतेने डॉ.सुयोग दांडेकर यांचे 'प्रकृती आयुर्वेदिक रिझॉर्ट' येथे आयोजित केला व नेहमीच्या मनोरंजनाच्या कार्यक्रमाला फाटा देऊन वेदाचार्य श्री.सुयोग दांडेकर यांचे भाषण व प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम ठेवला. डॉ.दांडेकर यांनी जवळजवळ एक तास उपस्थित सभासदांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरें देऊन बरेच घरगुती उपाय सुचविले व त्यांचे समाधान केले. डॉक्टरांच्या भाषणानंतर मी त्यांना अशी विनंती केली की, त्यांनी आपले 'संवाद' चे वाचकांसाठी आयुर्वेदावर माहितीपूर्ण लेख लिहून आम्हाला द्यावेत म्हणजे आम्ही ते 'संवाद' मध्ये छापून आपले १०,००० चे वर सभासदांपर्यंत त्यातील ज्ञान व त्यांचा सल्ला पोहोचवू. म्हणून माझी सर्व सभासदांना विनंती आहे की 'संवाद' मध्ये येणाऱ्या लेखांचा आपण आपली तब्येत सुधारण्यासाठी फायदा घ्यावा व आपली इच्छा असल्यास त्यांचे साताऱ्याजवळील कास पठारावर असलेल्या रिझॉर्टचा फायदा घ्यावा.

**- वि.मो.गोखले, अध्यक्ष**

************************************

# संधीवात बरा होतो?

संधिवात हा शब्द रोगरूपाने जनसामान्यांना बहुपरीचित असा आहे. साहजिकच बहुचर्चीत विषयाबद्दल अल्पज्ञानामुळे समजगैरसमज असतात. ते दूर करण्याचा हा एक प्रयत्न.

संधिवात या रोगाला शास्त्रीय शब्द आहे संधिगतवात. संधी म्हणजे सांधा, दोन हाडे ज्या ठिकाणी एकत्र येतात त्या सांध्याच्या ठिकाणी वात जाणे म्हणजे संधीगतवात. सामान्यत: दोन हाडे एकत्र येवून हालचालीचे काम करत असतात ही हालचाल घर्षणविरहीत व्हावी यासाठी सांध्याच्या ठिकाणी कफ असतो. कफाच्या बुळबुळीत गुणधर्माने खडखडाट न होता सांध्याची हालचाल चालू असते. हा बुळबुळीत गुणधर्म कमी झाला तर सांधे कटकट वाजू लागतात सूज येते व हालचालींच्यावेळी वेदना होतात. या लक्षणांनी सामान्यत: संधिवाताची सुरवात होते. योग्य औषधोपचार न केल्यास हा आजार जुनाट होवून मुरतो व शेवटी हातापायाची बोटे वाकडी होतात.

**अनेक गैरसमज**

संधिवाताबद्दल अनेक गैरसमज असतात. पैकी पहिला गैरसमज असा आहे की संधिवात प्रत्येक वृद्धांना होतो. यावर औषध घेण्याची गरज नाही कारण संधिवात असाध्य म्हणजे बरा न होणारा रोग आहे. माझ्या गुरूजींनी जी पंचभौतिक चिकित्सा पद्धती निर्माण केली त्याद्वारे निदान करून योग्य औषधोपचार केल्यास अमृतासारखा उपयोग होतो.

ॲलोपॅथीच्या डॉक्टरांकडे संधिवाताचा रोगी गेल्यास वेदनाशामक गोळ्या व इंजेक्शन, फार फार तर कॅल्शिअमच्या गोळ्या या पलिकडे ते काहीही करू शकत नाहीत. या गोळ्या इंजेक्शननेही तात्पुरत्या वेदना थांबतात. पण रोग बरा होत नाही मग कोणी सल्ला देतो की, अमूक एक व्यक्ती संधीवातावर औषध देते, तिथे औषध घेतले जाते किंवा संधिवातासारखे लेख, जाहिराती इ. पाहून काही तेले लावणे व सिंहनाद गुग्गुळ, महायोगराज गुग्गुळ, महारास्नादि क्वाथ इ. औषधे घेतली जातात. यानेही रोग कायमाचा बरा होत नाही. आयुर्वेदात संधिवातावर औषधच नाही असे उगाचच ठरवले जाते. जो वेद मानवाच्या कल्याणासाठी निर्माण झालं त्या संधिवातावर औषध नाही असं कसे म्हणता येईल. मी माझ्या अल्पशा अनुभवातले काही रूग्ण उदाहरणादाखल दाखवू शकतो की ज्यांचा संधिवात कायमचा बरा झाला.

**पांचभौतिक संप्राप्ती**

संधीवात कसा बरा होतो ते पाहू.

शरीर अन्न (आहार) ग्रहण करून ते पचवून अंगी लावणे व न पचलेले टाकून देणे या क्रियेवर चालू असते खाल्लेले अन्न आतड्यात आल्यावर यकृतातून येणाऱ्या पाचकस्त्रावांनी पचवले जाते. आवश्यक भाग आतड्यात शोषला जातो या सारभूत आहार रसापासून रसधातू बनतो. रसापासून रक्त मांस, मेद, अस्थी, मज्जा, शुक्र असे क्रमाने धातू बनतात.

समजा एखाद्याची पचनशक्ती चांगली नसेल, संडासला साफ होत नसेल तर हे रसादी धातू चांगले बनत नाहीत परंतु आपले कष्ट थांबत नाहीत पचन बिघडलेले असते. संडासला साफ होत नाही म्हणजे पगार तर मिळत नाही पण खर्च तर चालू असतो त्यामुळे शरीराची शिल्लक पुंजीही संपते व शेवटी सांध्यात कमकुवतपणा येतो.

आता काम, श्रम, कष्ट इ. या जास्त काम अथवा विकृत काम येते जसे उभे राहून स्वयंपाक करणे, हल्ली बायका उभे राहून काम करतात. त्यामुळे गुडघ्यात लवकर कमकुवतपणा येतो यात वजन असल्यास साहजिकच मेदाची अधिक वृद्धी होवून पुढील धातूंना पोषण मिळत नाही

पांचभौतिक चिकित्सेद्वारे संधिवात कसा बरा करता येतो याचं एक उदाहरण देतो. एकदा एक आजीबाई माझ्याकडे आल्या अतिकष्टाने पावले टाकत पायऱ्या चढत होत्या.

हातापायाची बोटे वाकडी झाली होती. म्हणाल्या, गेल्या १४ वर्षात संधिवातसाठी अनेक डॉक्टर, झाले पण गुण येत नाही.

मी त्यांना वरील विचार समजावून सांगितला, पोट तपासले अपान कक्षेला सूज आढळल्यावर पूर्वी अंगावर जास्त जात होते का, असे विचारले त्यांना एकदम आश्चर्य वाटले. त्यांनी सांगितले, अहो बादली लाल कपड्यांनी भरायची म्हणून डॉक्टरांनी पिशवी काढून टाकली पण आजतागायत हा प्रश्न मला कुणी विचारला नाही.

मी मनाशी म्हटले, हीच तर पांचभौतिक चिकित्सेची किमया, या आजीबाईचे रक्त अतीव प्रमाणात गेले होते. पिशवी काढणे हा यावरचा उपाय नव्हे. बरे, ऑपरेशन केले त्यानंतर रक्तधातू तरी सकस बनवण्याची उपाययोजना करायला हवी होती. या आजीबाईंना गर्भाशय, मूत्रपिंड व रक्तधातूवर परिणाम झाल्याने संधिवात झाला होता त्यावर वेदनाशामक गोळ्या इंजेक्शने, गुग्गुळ इ. कसे उपयोगी पडतील.

गर्भाशयाचा विचार करून त्यांना चिकित्सा दिली. प्रथम यकृत प्लीहा मुत्रपिंड या पचन करणाऱ्या अवयवत्रयींना ताळ्यावर आणले. याने पचन सुधारते व संडासला साफ होवू लागेल. नंतर रसधातूपासून सुरुवात करून शेवटी हाडांना बळकटी येण्यासाठी पंचसार, पदमक किटयोग डिंकातून दिला. याने त्यांची वाकडी झालेली बोटे देखील व्यवस्थित वळू लागली पण औषध ११ महिने घ्यावे लागले.

**संधीवाताची कारणे**

संधिवातावर चिकित्सा करताना वरील विचार हवा. संधिवातावर आयुर्वेदात काय चारच औषधे सांगितली आहेत का? आयुर्वेदात अमूक रोगावर अमुक औषध असा विचार नाही. रोग कसा घडला असावा याचे कारण पाहून चिकित्सा करावी. संधिवाताचे एक कारण वर सांगितले आहे पण इतर कारणेही आहेत.

१. अवेळी खाणे २. कमी खाणे ३. कोरडे खाणे ४. पचनशक्तीचा ५. प्रकृतीचा विचार न करता खाणे ६. अतिशय धावपळ ७. अध्व अर्थात प्रवास ८. गोवर, कांजिण्या न येणे ९. कावीळ नीट बरी न होणे (यकृती कमकुवत असणे) १०. अतिबौद्धीक ताण ११. विरूद्ध आहार १२. मलमूत्र वेग आवरून धरणे १३. पाळीच्या काळात काम करणे १३. मुरलेला ताप

इत्यादी कारणांनी वाताची गती बिघडते. ही गती सतत माणसाच्या डोक्यापासून पायाकडे चालू असते. संडासला साफ न होणे इ. कारणांनी या गतीला अडथळा निर्माण केला जातो. आऊट झालेले चाक खडखडाट करते. त्याप्रमाणे गती बदललेला वात सांध्याच्या ठिकाणी जाऊन तेथील वंगण कमी करतो. सोबतच जर पचन न होऊन पोषण नीट होत नसेल तर कमी झालेले वंगण भरून काढले जात नाही व संधिवात होतो.

तरी कृपया अमुक एक औषध संधिवाताचे आहे असे न म्हणता तज्ज्ञ वैद्याकडून मूळ कारण तपासून घ्यावे. हे मूळ कारण सकाळी उपाशीपोटी तपासण्याने कळते, म्हणूनच सर्व वैद्यांची चिकित्सा मंदिराची वेळ फक्त सकाळची असते. वैद्य मूळ कारण दूर करून संधिवात कायमचा बरा करू शकतात. जन्मतारखेप्रमाणे प्रकृती पाहून निदान केले जाते.

आयुर्वेदिक औषधे सेवनांचा काल जास्त असल्याने तात्पुरते वेदनाशमनासाठी तेल लावून औषधी वाफेने शेकणे (स्नेहन) स्वेदन गरम औषधी तेलाने आंघोळ घालणे (कायसेक पिंझिचिल) इ. पंचकर्म १५ दिवस केल्यास लगेच फरक पडतो.

संधीवातावर चर्चा करण्यापेक्षा तज्ज्ञांचा सल्ला केव्हाही घेणे योग्य होय. आयुर्वेदिक औषधांचे प्रमाणीकरण नसल्याने बाजारू औषध घेऊन आयुर्वेदात संधिवातावर औषध नाही असे आपण म्हणणार नाही याची आता मला खात्री आहे.

**- वैद्य सुयोग दांडेकर, आयुर्वेदाचार्य,**
प्रकृती आयुर्वेदिक हेल्थ रिसॉर्ट, सातारा
मोबा - ९८५०८४८४८२

# गजल

खांद्यावरी जयांच्या मी मान टेकविली
कापून ती तयांनी मज हाती आज दिधली

राहून अर्धपोटी मी घास ज्या भरविला
त्यानीच घास मुखिचा हिसकावूनी घेतला

छाया दिली जयाना राहून मी उन्हात
भाजून काढले मज भर तळपत्या जगात

आधार घेऊनि जे गगनास आज भिडले
पंगुत्व आज येता लाथाडूनी पळाले

तळहाती घेऊनिया जपले फुलापरि ज्या
निर्माल्य देह माझा सांदीस ठेवियेला

साहून कंटकाना पायी तनू पसरली
टोचून खोल भाले रक्तात ती भिजविली

लावून आप्त सारे ते रक्त आज भाळी
माझीच अंत्य यात्रा घोषात चालविती

**- आर. जी. कडवेकर**, सातारा
भ्रमणध्वनी - ९३७२६७३९८४

# कविता

जमेना जगी कोणते काम ज्यांना

कविता असे एक हत्यार त्यांना

दिसे त्यास काव्यपंक्ती उरावे

उभे आडवे अर्धमेले करावे

कविता आणि कवी हा अशा तऱ्हेने बहुतांश 'रसिक' जनांचा कुचेष्टेचा विषय. खरंतर थेट जन्माला येण्याच्या प्रक्रियेपासून प्रत्येकाचा कवितेशी संबंध येतोच. कधी गालिबचा शेर तर कधी तुकारामांचा अभंग बनून.

व्यवहारी जगात निव्वळ जगण्यासाठी करावी लागणारी धडपड कोणालाच चुकली नाही. परंतु त्या धावपळीचा अन्वयार्थ लावण्यासाठी काही क्षण काढावेच लागतात. असा एखादा क्षण कवितेला जन्म देतो. असं पु. लं. ना वाटतं तर अत्यंत मोजक्या आणि नेमक्या शब्दात ज्यात खूप आशय सामावलेला आहे असा विषय मांडणारा तो कवी अशा शब्दात प्रख्यात रंगकर्मी श्रीकांत मोघे यांनी नुकत्याच सांगली येथे पार पाडलेल्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात 'कवी'ची व्याख्या केली. उदाहरणादाखल ते म्हणतात-

शब्दात नसते दु:ख, शब्दांना सुखही नसते ।

ते वाहतात ओझे, ते तुमचे माझे असते ।।

अभंग, दोहे, चारोळ्या, श्लोक, शायरी ही आणि अशी अनंत रूपे घेत कविता जन्माला येते. अंगाईगीत, संस्कारासाठी श्लोक, प्रेम, विरह, व्याकुळता अशा भावना व्यक्त करण्यासाठी गझल शायरी अशी रूपं घेत घेत बहराला येते. आधुनिकतेचा वारा लागताच मुक्तछंद होऊन जाते.

सुरवातीच्या काळात ही कविता कानावाटे मनात शिरायची. मुद्रणकलेचा शोध अजून लागायचा होता. मुद्रणकलेचा शोध लागला आणि ही कविता छापील स्वरूपात डोळ्यापुढे आली.

ही छापील कविता मनातल्या मनात 'वाचली' गेल्यामुळे तोंडातून उमटणारा नाद संस्कार नाहिसा झाला. एक कमीपणा निर्माण झाला. ही कमतरता दूर करण्यासाठी अक्षरचित्रकार श्रीयुत र. कृ. जोशींनी सुलेखन कलेच्या माध्यमातून (कॅलिग्राफी) अक्षरांना चित्ररूप दिले. गीत सुरातून उमटावे तसे चित्राक्षरांतून कवितांना उमटविण्याचा यशस्वी प्रयत्न र. कृं.नी केला. आजही अच्युत पालव आणि त्यांचे काही सहकारी ही परंपरा प्रभावीपणे पुढे नेत आहेत.

ये लपेटून चांदणे घेऊ

तू कशाला दिलीस शाल मला ?

अशा ओळी वाचल्यावर कवितेत कोणत्याही प्रकारची कमी, त्रुटी आहे, असू शकते यावर विश्वासच बसत नाही.

कवितेच्या या साहित्यिक वाटचालीला नुकतेच एक वेगळे वळण मिळाले आहे. सॉरी कवितेला नाही, कवितेकडे बघणाऱ्याच्या दृष्टीकोनाला. प्रतिभा, स्फूर्ति, ऊर्मी अशा सहचारिणींनी जीचे डोहाळे पुरविले ती कविता व्यावहारिक पातळीवर आणून वैज्ञानिक कसोट्यांवर तावून सुलाखून घेण्याचे ठरविण्यात आले. स्कॉटलंड मधल्या मानसशास्त्रज्ञांनी हे काम केले. काव्य ही एक मेजवानी आहे असे त्यांचेही मत आहे. त्यांनी काढलेले काही निष्कर्ष.

१) सखोल विचार करण्यासाठी आवश्यक असलेली डोळ्यांची हालचाल जेवढी काव्याच्या आस्वादाने होते तेवढी कादंबरी किंवा अन्य साहित्य वाचनाने होत नाही.

२) कविता ऐकताना रसिकांच्या चेतापेशींच्या हालचालीत मोठ्या प्रमाणावर वाढ होते.

मेंदूच्या प्रतिमा घेणाऱ्या तंत्रज्ञानाचे साहाय्याने (ब्रेन इमेजिंग टेक्नॉलॉजी) हे सिद्ध झाले आहे.

३) मेंदूतील अव्यक्त बाबी ज्या लहानपणी कवितांमुळे, संगीतामुळे तयार झालेल्या असतात, त्यांना काव्यामुळे जागरूकता येते, असे सेंट ॲन्ड्युज विद्यापीठातील साहित्याच्या तज्ज्ञ जेन स्टॅबलर यांचे मत आहे.

४) पुढे त्या असंही म्हणतात की काव्यामधला कल्पना शक्तीचा वापर रसिकांना प्रत्येक ओळीवर एकाग्र व्हायला भाग पाडतो.

५) काव्यातील वेगळ्या भाषेमुळे त्यातील शब्दांकडे चित्त आकर्षिले जाते.

निसर्गत:च असणाऱ्या ह्या प्रवृत्तीमुळे लहान मुलांनाही संगीत व ठेक्याची आवड असते.

६) संशोधकांनी अवरक्त किरणांच्या साहाय्याने वाचकांच्या डोळयांचा अभ्यास केला असता कविता वाचताना इतर साहित्याच्या तुलनेत अधिक भास होतो असे जाणवले.

थोडक्यात कविता ही मनाला मेजवानी आहे. त्याने मन एकाग्र करता येते-होते. त्या प्रोसेसमध्ये मेंदूवर थोडा ताण पडतो आणि हा ताण मोजता येतो. (मशीनच्या सहाय्याने) पण ती मेजवानी आहे हे विसरू नका. म्हणून कविता वाचा. मनासाठी!

**- नी. व. ओढेकर,** नासिक

भ्रमणध्वनी - ९८९०२२२५८३

# माझे माहेर पंढरी एक पुण्यस्मरण

२४ जानेवारी २०१२ रोजी पं. भीमसेन जोशी यांचा प्रथम स्मृतीदिन साजरा झाला. पंडीतजींच्या आठवणीत एक वर्ष कसे निघून गेले ते कळलेच नाही. मला सोमवार दि. २४ जानेवारी २०११ हा दिवस परत डोळ्यापुढे आला. मी सकाळी ११ च्या सुमारास काही कामानिमित्त राजेंद्रनगरमधून जात होतो. वाटेत रस्त्यात बरीच गर्दी दिसली आणि मनात पाल चुकचुकली. थांबून चौकशी केल्यावर जे होऊ नये असे वाटत होते तेच वृत्त कानी आले. पं. भीमसेन जोशी गेले. दुःखद अंतःकरणाने 'कलाश्री' बंगल्याजवळ आलो. बाहेर पत्रकार, छायाचित्रकार व इतर चाहत्यांची गर्दी होती. फाटकात उभे राहिल्यावर आतील कार्यकर्त्यांनी सांगितले की ज्यांना दर्शन घ्यायचे आहे त्यांनी आत यावे. बाहेरच्या हॉलमध्ये पंडीतजींचे पार्थिव ठेवलेले होते. आम्ही आत. तिघे-चौघेच होतो. अतिशय शांततेत व काही गडबड न होता पंडीतजींचे अंत्यदर्शन घ्यायला मिळाले. डोळे अश्रूंनी भरून आले. नमस्काराकरिता हात जोडले असतानाच माझ्या मोबाईलची रिंग वाजली. विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल विठ्ठल माझे माहेर पंढरी. क्षणभर आजुबाजूची मंडळी पंडितजींचा अभंग ऐकून आश्चर्यचकित झाली. भांबावून जाऊन मी घाईघाईने फोन कट केला. 'आपला विठ्ठल आता पुन्हा दिसणार नाही' या विचारात अंत्यदर्शन मी घेत असताना मोबाईल सारख्या निर्जीव वस्तूने देखील आपली आदरांजली वाहावी हा किती विचित्र दैवयोग!

पं. भीमसेन जोशी यांची तब्येत बरी नसे. तेव्हा एकदा तरी त्यांचे दर्शन घेऊन पादस्पर्श करावयास मिळावा अशी असंख्य रसिकांप्रमाणेच माझीही मनोकामना होती. परंतु ती अपूर्णच राहिली. माझ्या मुलाचे डिसेंबर २०१० मध्ये लग्न झाले. सोमवार दि. २४ जानेवारी २०११ रोजी आम्ही आमच्या कुलदैवताचे दर्शनास जेजुरीला जाण्याचे योजले होते. काही कारणाने ते रद्द झाले. त्याच दिवशी पंडितजी गेले व मला त्यांचे अंत्यदर्शन घेण्याची दुर्मिळ संधी मिळाली.

पंडितजींच्या संगीताने दिलेल्या स्वर्गीय आनंदाच्या बळावर बँकेतील कामाचा शीण कधीच जाणवला नाही. आता पंडीतजींची ही आठवण उराशी बाळगून उर्वरित आयुष्य त्यांच्या संगीताच्या श्रवणात आनंदाने व्यतीत करीत आहे.

**- दत्तात्रय विश्वनाथ कुलकर्णी**, पुणे
भ्रमणध्वनी - ९८५०८३९५९५

# रम्य आठवणी

## लतादिदींचा फोन

रविवार दि. २० मार्च २०११ रात्री ११ वाजण्याचा सुमार होता. मी झोपण्याच्या तयारीत असतानाच मोबाईल फोन वाजला. तो घेतल्यावर पलीकडून आवाज आला मी लता मंगेशकर बोलतेय. माझा माझ्यावर विश्वास बसेना. प्रत्यक्ष स्वरसम्राज्ञी बोलत होती.

''सॉरी हं, तुमची झोपमोड झाली का? त्यांची विचारणा, नाही हो, मी जागाच आहे. तुमच्या फोनमुळे मला खूप आनंद झाला'' मी उत्तरलो. त्यांनी माझ्या प्रकृतीची चौकशी केली, लवकर बरे व्हा अशा शुभेच्छा दिल्या. तुमचे पत्र मी पूर्ण वाचले, ते खूपच छान आहे असे त्या म्हणाल्या.

मी केमोथेरपी उपचारासाठी सुमारे ६ महिने दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये जात होतो. त्यानंतर मी त्यांच्या प्रसिद्धी अधिकाऱ्यातर्फे त्यांना एक पत्र पाठवले होते. हॉस्पिटलमधील डॉक्टर-नर्सची हसतमुख सेवा, तेथील सुरम्य परिसर, दीनानाथ माई यांचे पुतळे, श्री गणेश मंदिर, संगीतकारांचे कॅलेंडर आणि किशोरकुमार यांच्या स्मृतिदिनाबद्दल लिहिले होते.

**********

## ठेव पावती पिकली

मी शेती विकास शाखेत (सातारा) असतानाची ही घटना आहे. एके दिवशी एक ग्रामीण ठेवीदार माझ्याकडे आला. त्याने बँकेचे पत्र दाखवले - तुमची ठेव पावती पिकली आहे, बँकेत यावे. त्याला अर्थबोध झाला नाही म्हणून मला विचारीत होता. मी मागील बाजूस इंग्रजी मजकूर पाहिल्यावर खुलासा झाला. Fixed Deposit Receipt Matured असे ते वाक्य होते. शेजारच्या राज्यातून बदलून आलेल्या माझ्या सहकाऱ्याने त्याचा अनुवाद वरीलप्रमाणे केला होता. मी चकित झालो. तुमच्या पावतीची मुदत संपली आहे, रक्कम घ्यावी किंवा नूतनीकरण करावे असे त्यास सांगितले.

**********

## प्रकाश लोडगे

मी कराडला बँकेत असतानाची ही घटना आहे. बराच वेळ थांबूनही चेकची रक्कम न मिळाल्याने एक ग्राहक पेईंग कॅशियरकडे गेला. ''मी किती वेळ थांबायचे'' त्याने तावातावाने विचारले. ''मी बऱ्याच वेळ पुकारले, तुम्ही आला नाहीत'' कॅशियर म्हणाला. मी जाऊन तो चेक पाहिल्यावर खुलासा झाला. Prakash Lodge-(लॉज) या नावाने चेक होता. कॅशियरने त्याचा उच्चार प्रकाश लोडगे असा केल्याने हा गोंधळ झाला होता.

**- सुभाष सरदेशमुख**, सातारा
भ्रमणध्वनी - ९४२०४८५५६३

# नियतीचा खेळ

मनुष्य हा नेहमी इच्छा, आशा, अपेक्षा ठेवूनच आपले जीवन जगत असतो. असा काही काळ येतो की आपल्या काही इच्छा मनी तशाच राहिलेल्या असतात व त्या काही इच्छा पूर्ण करण्यासाठी योग्य संधी अनुकूलता यावयास लागते.

जीवनात एकच ठिकाण मात्र बरेच वर्ष बघून घेण्याचे राहिले होते आणि ते म्हणजे नेपाळ. मनातली नेपाळची सहल संकल्पना साकारण्याचा योग आला आणि आमची नेपाळ ट्रीप सुनिश्चित झाली. मनात संकल्प साकारण्याच्या हिंदोळ्यावर बसून झोके घेत घेत नेपाळमधील सर्व ठिकाणे बघत बघत श्री पशुपतीनाथाच्या ठिकाणी आमचे आगमन झाले. सर्वांनी मिळून दर्शन अभिषेक पूजा केली. नेपाळला आलो ते मात्र श्री ट्रॅव्हलतर्फे आलो होतो. त्या दिवशी पशुपतीनाथाच्या सान्निध्यात १ दिवस राहून दुसरे दिवशी मनोकामना हे देवीचे ठिकाण पहाण्यासाठी प्रस्थान केले. ट्रीप तशी बरी चालली होती. मनोकामना मंदीर हे उंच असून तेथे जाण्यासाठी रोपवेचा उपयोग करतात. हा रोपवेचा आनंद घेत असताना मात्र नियतीने हळूहळू रूसण्यास सुरवात केली. आनंदाच्या हिंदोळ्यावर बसलेल्या आम्हा उभयतांना, नियती एवढा मोठा धक्का देऊन जणू जमीनदोस्तच करेल स्वप्नात सुद्धा वाटले नव्हते. पण म्हणतात ना ''देवाघरचे ज्ञात कोणाला?''

माझ्या मिस्टरांना ८ ते ९ वर्षापूर्वीच मधुमेह आजार सुरू झाला होता. म्हणून औषध पाणी पथ्य हे सर्व काटेकोरपणे पाळणे सुरू होते. परंतु आता आपल्याला देशाबाहेर जावयाचे आहे म्हणून सर्व तपासण्या करून डॉक्टरी सल्ल्यानेच बाहेर पडलो होतो. परंतु दैवलिखित मात्र कधीच कोणालाच चुकले आहे काय? मनोकामना देवीचे मंदिर पाहून इतर ठिकाणे पाहून पोखरा ह्या ठिकाणी मुक्कामास आलो. त्या वेळेस साधारण संध्याकाळचे ५ वाजले होते. आणि त्याच वेळी आम्ही आमच्या भारतात असणाऱ्या दोन्ही मुलांना फोन करून पोखरा येथील परिस्थितीची कल्पना दिली. कारण त्यावेळेस पोखरा येथील प्रचंड पाऊस, वारा ह्यामुळे आता ''ह्या पुढे आपला फोन संपर्क दोन दिवस तरी होणार नाही, तरी तुम्ही अजिबात आमची काळजी करू नका, कारण येथील निसर्गाचे तांडव कधी थांबेल, हे सांगता येणार नाही व आता तर काय दोन दिवसांनी आम्ही भारतात येणारच आहोत.'' अशा आशयाचा फोन भारतात असणाऱ्या दोन्ही मुलांना केला म्हणजे तिकडे भारतात आमची दोन्ही मुले निश्चिंत व आम्ही निवांत. साधारण १ ते १|| तास गेला असेल आणि अचानक माझ्या मिस्टरांना श्वास घेण्यास त्रास सुरू झाला, परंतु थोडा वेळ विश्रांती घेतल्यावर बरे वाटू लागले. ह्यांना बरे वाटू लागले म्हटल्यावर मी पण निश्चिंत झाले आणि आता उद्या काय पहायचे व कसे आपण भारतात जाऊन आपल्या मुलांना ट्रीपची मजा सांगू ह्या विचार करत असतानाच परत माझ्या मिस्टरांना पहिल्यापेक्षा जास्तच श्वास घेण्यास त्रास सुरू झाला आणि माझ्या पायाखालची वाळूच सरकली. नाना विचारांचे डोक्यात काहूर माजले कारण ह्यांना जरी ॲडमिट करावयाचे तर हे डॉक्टर, हॉस्पिटल ह्याचे टेन्शन घेणार व त्या टेन्शनने काही विपरीत घडणार नाही ना? पण ह्यांची एकंदरीत परिस्थिती बघता ह्यांना हॉस्पिटल मध्येच ॲडमिट करणे योग्य म्हणून मी हॉटेलच्या मॅनेजरच्या सहाय्याने टूर मॅनेजरला बरोबर घेऊन पोखरा येथील चरक हॉस्पिटल ॲडमिट केले. पोखरा गावाच्या नावाप्रमाणे मी मात्र अंर्तबाह्य पोखरून गेले होते, कारण ॲडमिट केल्या केल्या डॉक्टरांनी हे खूप सिरीयस असून तुमच्या जवळच्या नातेवाईकांना बोलवा, कोणते जवळचे नातेवाईक आणि कोण आपले नातेवाईक मला तर हे सगळे अनाकलनीयच होते. कारण नेपाळमधील १८ तास लोड शेडिंग, सतत पडणारा बर्फाचा पाऊस आणि आपला माणूस दवाखान्यात अत्यंत सिरीयस अशा वेळी काय करणार आणि त्याच वेळेस मला आमच्या श्री गगनगिरी महाराज व गजानन महाराज ह्यांनी एकदम बळ दिले व मी टूर मॅनेजरच्या सहाय्याने भारतात असणाऱ्या आमच्या मुलाला फोन केला. त्यावेळी घड्याळात ९ वाजले होते. ''तू आत्ताच्या आत्ता ताबडतोब निघून ये, तुझे बाबा खूप सिरीयस आहेत.'' मी फोन केला खरा पण त्यावेळेस माझ्या मुलाची व सुनेची काय अवस्था झाली असेल?

मन नुसते सैरभैर झाले होते. अशाही परिस्थितीत टूर मॅनेजर मात्र मला एकटीला हॉस्पिटलमध्ये सोडून गेला. आता ही काळरात आपण कशी काढावयाची असा विचार करत साधारण २ तास घालवले आणि म्हणतात ना तुम्ही आयुष्यात काही चांगल्या गोष्टी केल्या असतील व गुरुंची साथ, आशीर्वाद असतील तर मदतीला तेच धावून येतात. त्याचे प्रत्यंतर मला आले कारण त्याच हॉस्पिटलमधील एक नेपाळी वॉचमन माझ्या मुलाच्या वयाचा माझ्या समोर देवदूत म्हणून धावून आला. त्यांनी मला आधार दिला खरा, पण मीच इतके कोलमडले होते की तो काय बोलतोय, काय सांगतोय हे माझ्या लक्षातच येत नव्हते. ती रात्र मी आयुष्यभर विसरणार नाही. पहाट झाली आणि थोड्या वेळातच मला डॉक्टरांनी ह्यांना भेटण्याची परवानगी दिली. मी बघितले तर ह्यांना खूपच बरे वाटण्यास लागून हे म्हणाले सुद्धा ''उगीच चि. मनिष ह्यास भारतातून बोलविले. आता काय मला बरे वाटले की आपण लवकरात लवकर आपल्या भारतात घरी जाऊ.'' जरी रात्र मी घालविली असली तरी वेळोवेळी माझा मुलगा रात्री फोनवरून धीर देऊन मी येत आहे असा धीर देत होता.

दुसऱ्या दिवशी त्यांच्या तब्बेतीत सुधारणा होताना दिसली आणि चि. मनिष मजला दर मजल करत अत्यंत विमनस्क मनाने हॉस्पिटलमध्ये पोहचला. त्याला पाहाताच ह्यांचा चेहरा एवढा खुलला

की आतड्याचे माया प्रेम काय असते ह्याचे प्रत्यंतर आले. कदाचित आता आपण मुलाबरोबर भारतात जाऊ किंवा आता जरी आपणाला देवाचे बोलावणे आले तरी आपल्या पत्नीची (आईची) जबाबदारी घेणारा आपल्या रक्ताचा दुवा आला म्हणून सुद्धा चेहरा खुलला असावा. तो दिवस आमच्या तिघांचा तसा चांगला गेला म्हणायचा.

दिवसभर ह्यांना कोणतीही कृत्रिम उपकरणे लावण्यास लागली नव्हती व थोडे फार चहापाणी खाणे गेले होते. ती रात्र आमची बरी गेली व पुढे भारतात कसे जायचे हा विचार करण्यात गेली. जणू नियतीने मला हुलकावणीच दिली.

शुक्रवार म्हणजे तिसऱ्या दिवशी सकाळी चहा पाणी आम्ही तिघांनी एकत्र घेतले आणि भारतात जाण्याविषयी गप्पा मारल्या आणि परत डॉ. जेव्हा व्हिजीटला आले तेव्हा डॉक्टरांनी ह्यांच्या हृदयाची एक परीक्षा करण्यास सांगितली आणि त्यावेळेसच नियती माझ्यावर जणू रूसत चालली होती. कारण टेस्ट करण्यास जाताना जाणारा मनुष्य व्यवस्थित बोलतो काय आणि परत येताना निपचित होतो काय मला तर काहीच सुचेना पण तरी सुद्धा मी वेड्यासारखी ह्यांना अहो! अहो! म्हणून हाका मारत होते आणि त्यावेळेसच देव ह्यांना माझ्यापासून हिरावून घेत होता. डॉ. आतमध्ये प्रयत्न करत होते. माझा मुलगा पण मला वेळोवेळी धीर देत होता. पण माझ्या अंर्तमनाने मला ग्वाही दिली की हे आपल्यापासून खूप दूर गेले आहेत. कधीच परत न येण्यासाठी. आणि तसेच घडले. साधारण तास दोन तासांनी ह्यांना देवाज्ञा झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले आणि माझे होते नव्हते ते अवसान गळून गेले.

आधीच दोन दिवस एवढे टेन्शन आणि त्यात हा एवढा मोठा धक्का. अशा विचित्र मन:स्थितीत असतानाच एका भल्या माणसाने म्हणण्यापेक्षा आमच्या गुरूंनीच त्याच्या रूपाने आम्हाला एक फोन नंबर दिला आणि तो फोन नेमका एका मराठी माणसाचा म्हणजे ‘सुहास बिरादार’. हे आर्मीत. नेपाळमधील सर्व आर्मी त्यांच्या अधिपत्याखाली आहे. हे सर्व झाले असले तरी ह्या परिस्थितीत आता पुढे काय करायचे, कारण नाही आपली माणसे, नाही आपला देश, नाही आपली भाषा पण ह्या ठिकाणी गुरूंनी मात्र मला साक्षात मी पाठीशी आहे ह्यांचे प्रत्यंतर दिले. आम्ही दोघेही पहिल्यापासून धार्मिकतेच्या बाबतीत श्रद्धाळू पण अंधश्रद्धा जरासुद्धा आमच्या मनाला भावली नाही. त्यामुळे समोरचा जो कोणी संकटात असेल त्याला होता होईल तेवढी मदत करणे म्हणजे ईश्वरपूजा किंवा गुरूंचे स्मरण एवढी मनात खूप गाठ बांधल्या कारणानेच आम्हाला मराठी माणसाचा हात मदतीसाठी पुढे आला. भारतात असणाऱ्या आमच्या मोठ्या दिरांशी व माझ्या मोठ्या भावाशी फोन संपर्क साधून प्राप्त परिस्थितीत ह्यांचा अंत्यविधी नेपाळमधील ‘शेती’ नदीच्या तीरावर अगदी हिंदू धार्मिक पद्धतीने पार पडला. पण एक मात्र आहे की ह्यांच्या अशा मृत्यूमुळे मी अगदी एकाकी पडले जरी आप्तेष्ट असले तरी आपला हक्काचा माणूस गेल्यावर जी पोकळी निर्माण होते, ती पोकळी कधीच कोणी भरून काढू शकत नाही आणि आता ह्यांचा अंत्यविधी तिथे पार पाडला असला तरी मी मात्र हात हलवत त्यांना तेथेच ठेवून आल्याची खंत उराशी बाळगत पुढील आयुष्य कंठणे माझ्या हातात राहिले. काय करणार?

सुरुवातीला कऱ्हाडला आल्यावर एकटे राहण्यास सुरुवात करायची खरी, पण कशी सुरुवात करायची हेच कळेना. त्याच कालावधीत माझ्या मैत्रिणी मला आधार देण्यासाठी माझ्या दु:खावर मायेची फुंकर घालण्यासाठी येत असत. माणूस हा सवयीचा गुलाम असतो हेच खरे. मी सुद्धा तशी ह्यांना सोडून कधीच एकटी राहिलेली नाही. पण ह्या प्रसंगाने माझ्यावर एकटी राहाण्याचे व जीवन कंठण्याचे दिवस आले आहेत, सध्या तरी कोणाच्या अधिपत्याखाली राहावे, परस्वाधीन जीवन कंठावे असे वाटत नाही. मी स्वत: पंचरत्न वधूवर कऱ्हाड शाखा नं. ३२ ची संचालिका म्हणून कार्यरत आहे. त्यामुळे मला माझ्या मनाला विरंगुळा मिळून सामाजिक बांधिलकी पण सांभाळली जात आहे.

**- वनिता विकास आपटे**, कराड

भ्रमणध्वनी - ९४२३०३३३९०

## मैत्रीचे गणित

मैत्रीमध्ये वजाबाकी, दोषांची करावी
मैत्रीमध्ये बेरीज गुणांची करावी
मैत्रीत हवा गुणाकार, मैत्रीत नको भागाकार
मैत्रीच्या गणितांमधे, शून्याला नकोच आधार !
जीवनात सुविचारांनी मैत्रीचे धागे विणावे
विणता विणता धाग्यांनी, जाळे सुंदरसे बनवावे
मैत्रीच्या जाळ्यात खूप खूप गुरफटावे
मैत्रीचे गणित नंतर, आयुष्यात ना सुटावे !!

**- व्ही. व्ही. देशपांडे**, सोलापूर

भ्रमणध्वनी - ९०११६६७१२७

पुस्तक परीक्षण

# श्री टेंबे स्वामी भक्तवत्सल दत्तावतार



आपले मुलूंड येथील एक सभासद श्री. विद्याधर हरि गुर्जर यांचे प. पू. श्री. केशवराव जोशी महाराज यांनी लिहिलेल्या श्री. थोरले स्वामी महाराज (टेंबे स्वामी) यांच्या चरित्र ग्रंथात समाविष्ट असलेले प्रसंग, कथा यांचे संकलन करून लिहिलेले वरील पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. श्री गुर्जर यांनी आपल्या मनोगतात लिहिल्याप्रमाणे पुस्तकाची रचना छोटे छोटे प्रसंग, बोध कथा अगदी मोजक्या शब्दात सादर केल्या आहेत. सर्वच प्रसंग, कथा स्वतंत्र असल्यामुळे कोणत्याही कथेपासून आपण वाचनास सुरूवात करू शकतो.

पुस्तकात प. प. श्रीमत् वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी यांच्या जन्मापासून महानिर्वाणापर्यंत कालखंड आला आहे. यातील काही प्रसंग अतिशय उत्कट, मनावर खोल परिणाम करणारे, आत्मबोध, आत्मशोध करण्यास प्रवृत्त करणारे असेच आहेत. छत्तीस वर्षे माणगावात राहून देवांच्या आज्ञेप्रमाणे बुवा आणि सौ. अन्नपूर्णाबाईंनी माणगाव सोडतानाच प्रसंग अत्यंत हृदय व मन हेलावणारा आहे. सासरी सासूबाईंचा जाच सहन करणाऱ्या, स्वामींची सेवा करून त्यांना योग्य ती साथ देणाऱ्या योगाभ्यासात प्रगत असणाऱ्या सौ. अन्नपूर्णा बाईंचे व्यक्तिचित्र कायम स्मरणात राहते आणि यामुळेच त्यांना आजारपणात आलेला मृत्यूचा प्रसंग मनाला चुटपूट लावून जातो. सौ. अन्नपूर्णाबाईंचा योगाभ्यास, संन्यास धर्माचे कठोर पालन इ. प्रसंग मूक चित्रांनी शब्दांपेक्षा अधिक बोलके केले आहेत. या बाबतीत चित्रकार श्री. अभय पुरंदरे यांची लेखकास मोलाची साथ लाभली आहे.

वासुदेवानंद सरस्वती देवाच्या आज्ञेशिवाय काहीही करत नसत. परंतु काही कारणांनी आज्ञेचे पालन झाले नाही तर देव त्यात विघ्न उपस्थित करत. (उदा. गोकर्ण महाबळेश्वर यात्रा) वाडीला पुजाऱ्यांना आचारसंहिता घालून दिल्यावर स्वामींना आज्ञेची आठवण झाली. (खंड २, ६२) त्याप्रमाणे त्यांनी वाडीहून निघून जाण्याचा विचार सर्व मंडळींना कळवला. लोकांनी त्यांना आणखी राहण्याची विनंती केली. स्वामींनी त्यांना देवांच्या आज्ञेबाहेर मला जाता येत नाही. आता येथून निघण्याची आज्ञा झाली आहे असे सांगितले. तरीसुद्धा लोकांच्या खास आग्रहास्तव स्वामींनी वाडीचा मुक्काम चार दिवस वाढवला. येथे स्वामींकडून देवांच्या आज्ञेचे पालन झाले नाही. म्हणून देवांनी त्यांना शिक्षा वा समज दिल्याचा उल्लेख, स्पष्टीकरण कुठेच आढळत नाही.

पुस्तकाची भाषा सहज, सोपी सरळ (मुद्रण दोष वगळता) अशीच आहे. कुठेही शब्दांचे अवडंबर नाही कि उपमा अलंकारांचा हव्यास नाही. अशी भाषा पुस्तकाचा पोत सांभाळायला मदत करणारीच आहे. ज्यांना आध्यात्माची आवड आहे त्यांनी तर जरूर वाचावेच, परंतु इतरांनीही एकदा तरी वाचावे असे हे पुस्तक आहे. याबद्दल लेखक श्री. विद्याधर गुर्जर खचितच अभिनंदनास पात्र आहेत.

श्री गुर्जरांची आतापर्यंत प्रकाशित झालेली पुस्तके

१) गणेश, उपासना मार्ग २) आपल्याच मंत्रशक्तीबद्दल ३) मनात घोळवण्यासाठी ४) सार्थ श्री गणेश अथर्वशीर्ष याशिवाय मासिक शुभंकर, शिवसामरस्य इ. अनेक मासिकातून त्यांचे लेख प्रसिद्ध झाले आहेत.

श्री. गुर्जर यांचे पुनश्च अभिनंदन व त्यांच्या पुढील लेखन कार्यास हार्दिक शुभेच्छा.

**- प्रभाकर गुपचूप,** पुणे
भ्रमणध्वनी - ९८८१५७९४९९

## पुतळे

जितके चौक, तितके पुतळे
नेते करिती अनावरणाचे सोहळे

आनंदी आनंद गडे
पुतळेच पुतळे चोहिकडे

प्रारंभी देखभाल-आस्था
नंतर मात्र दुर्लक्ष-अनास्था

त्यांच्या मस्तकी, पक्ष्यांची विष्ठा
पायांशी, प्रेमी-जनांच्या चेष्टा

ते सतत करताहेत सहन
थंडी, वारा, पाऊस, ऊन

ते करताहेत मूकपणे रूदन
अन् जगताहेत मरणानंतरचे मरण

तरिही पुतळे उभारले जात आहेत
संधीसाधू हौस, भागवत आहेत

**- अरूण भट,** बदलापूर
भ्रमणध्वनी - ९६०४३८३६०७

# संवाद लेख स्पर्धा २०१२

'संवाद'च्या जानेवारी २०१२ च्या अंकास सभासदांसाठी एक लेख स्पर्धा जाहीर केली होती. विषय होते १) मागे वळून बघताना (सुखी आणि समाधानी निवृत्ती नंतरचे जीवन माझे अनुभव) किंवा २) मी जोपासलेले छंद. या स्पर्धेसाठी पुरुष सभासदांकडून २९ तर स्त्री सभासदांकडून २१ असे एकूण ५० लेख स्पर्धेमध्ये दाखल झाले. स्पर्धेत भाग घेतलेल्या सभासदांची नावे खालीलप्रमाणे.

**पुरुष विभाग-** १) श्री. बाळासाहेब कृ. कुलकर्णी, अहमदनगर २) श्री. अरूण सावरकर, कांदिवली ३) श्री. दत्तात्रय क्षीरसागर, पुणे ४) श्री. सुधीर बा. तुर्केवाडीवर, कराड ५) श्री. अरविंद पुजारी, सोलापूर ६) श्री. श्रीराम बर्वे, पुणे ७) श्री. विजय वैद्य, पुणे ८) श्री. माधव रानडे, डोंबिवली ९) श्री. चंद्रशेखर निरंतर, पुणे १०) श्री. प्रदीप इनामदार, पुणे ११) श्री. दीपक आपटे, पुणे १२) श्री. सूर्यकांत भोसले, मुलुंड १३) श्री. अशोक कुलकर्णी, कोल्हापूर १४) श्री. सुधाकर मराठे, पुणे १५) श्री. प्रभाकर खेडकर, अमरावती १६) श्री. विजय आगाशे, पुणे १७) श्री. ब्रिजलाल नाईक, पुणे १८) श्री. यशवंत पिंगळे, नागपूर १९) श्री शरच्चंद्र चौधरी, नाशिक २०) श्री. गजानन जोशी, कोल्हापूर २१) श्री. सुरेश कशेळीकर, पुणे २२) श्री. चंद्रकांत गाडगे, नागपूर २३) श्री. विठ्ठल कट्टी, सांगली २४) श्री. पद्माकर शिरवाडकर, ठाणे २५) श्री. विनोद रणदिवे, बोरीवली २६) श्री. अरूण भट, बदलापूर २७) श्री. अंबादास कुलकर्णी, अंधेरी २८) श्री. गजानन अराणके, पुणे २९) श्री. अरविंद जोशी, सांगली

**स्त्री विभाग -** १) सौ. तेजस्विनी कानिटकर, कोल्हापूर २) सौ. वर्षा देशपांडे, नागपूर ३) सौ. नेत्रा काकडे, अकोला ४) श्रीमती वनिता आपटे, कराड ५) सौ. शीतल पटवर्धन, अहमदनगर ६) गीता सुळे, ठाणे ७) सुनिता भणगे, बोरीवली ८) सौ. अरूणा कर्णिक, अंधेरी ९) संपदा वागळे, ठाणे १०) सौ. कार्तिकी काळे, बोरीवली ११) नलिनी भागवत, नागपूर १२) श्रीमती सुजाता गुप्ते, विलेपार्ले १३) सौ. रेखा जोशी, डोंबिवली १४) सौ. सरिता देशमुख, नाशिक १५) सौ. अपर्णा पांडे, यवतमाळ १६) श्रीमती जयश्री जोशी, कांदिवली १७) मंगला नातू, दहिसर, मुंबई १८) श्रीमती सुहासिनी जोग, नागपूर १९) विमल ग. अनगळ, नागपूर २०) माधवी कुलकर्णी, नगर २१) श्रेयसी श्री. मोहिनी (मालेगाव) २२) श्वेता देवरूखकर, गिरगाव-मुंबई

विषयवार विभागणी केली तर 'मागे वळून बघताना' (सुखी आणि समाधानी निवृत्ती नंतरचे जीवन) या विषयावर २१ लेख तर 'मी जोपासलेले छंद' या विषयावर ३० लेख आले.

## स्पर्धेविषयी थोडं मनोगत

या वर्षीच्या 'संवाद' लेख स्पर्धेत एकूण ५१ लेख सादर झाले. स्त्री विभागातून २२ लेख आले तर पुरुष विभागातून २९ लेख आले. एकूण सभासदांची संख्या लक्षात घेता स्पर्धेतील लेखांची संख्या अल्पच म्हणावी लागेल. स्त्री सभासदांकडून मागील वर्षापेक्षा कमी प्रतिसाद मिळाला. पुरुष विभागात या वर्षी समाधानकारक प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेसाठी निवडलेले विषय सर्वांच्या परिचयाचे होते. त्यामुळे सभासदांकडून जास्त लेख स्पर्धेत दाखल होतील. अशीच आमची धारणा होती. असो.

मागे वळून बघताना (सुखी आणि समाधानी निवृत्ती नंतरचे जीवन) या विषयावर लिहिताना सभासदांनी निवृत्तीपूर्वी व निवृत्तीनंतरच्या अनुभवांची चांगल्या रीतीने सांगड घातली आहे. निवृत्तीनंतरही आलेले काही कटू अनुभव त्यातून घेतलेली शिकवण व त्यांचा पुढील आयुष्य आनंदमय, सुखी करण्यासाठी केलेला उपयोग या संबंधी फारच कमी लेखकांनी आपले अनुभव प्रकट केले आहेत. ही त्रुटी वगळता लेखकांनी आपले लेखन उत्तम तऱ्हेने सुंदर हस्ताक्षरात केले आहे.

'मी जोपासलेले छंद' या विषयावर लिहिताना बऱ्याच लेखकांनी छंद म्हणजे काय, त्यांचे प्रकार यावरच जास्त भर दिलेला आढळला. त्यामुळे मूळ मुद्याकडे जरा दुर्लक्षच झालेले आढळले. आपला छंद, आपल्याला नक्कीच आनंद देतो परंतु याच छंदाचा उपयोग दुसऱ्यांना आनंद देण्यासाठी कसा करता येतो हे काही लेखकांनी परिणामकारक रीतीने लिहिले आहे. काही लेखात, कवितेच्या ओळी, इंग्रजी म्हणी, अभंगाच्या ओळी याचा अतिवापरही केलेला आढळला. ही व अशा काही गोष्टी सोडल्यास एकूण लिखाण समाधानकारक होते.

स्पर्धेत दाखल झालेल्या सर्व लेखांचे परीक्षण केल्यावर लेखाची भाषा, मांडणी, मुद्यांचे स्पष्टीकरण या गोष्टी लक्षात घेऊन संपादक मंडळाने एकमताने पारितोषिकपात्र लेखांची निवड खालीलप्रमाणे :

**पुरुष विभाग -**

१) प्रथम क्रमांक रू. ५००/- (रु. पाचशे फक्त)
श्री. पद्माकर शिरवाडकर, ठाणे

२) द्वितीय क्रमांक रू. ३००/- (रु. तीनशे फक्त)
श्री. बाळासाहेब कुलकर्णी, अहमदनगर

३) तृतीय क्रमांक रू. २००/- (रू. दोनशे फक्त)
श्री. ब्रिजलाल नाईक, पुणे

**स्त्री विभाग -**

१) प्रथम क्रमांक रू. ५००/- (रू. पाचशे फक्त)
श्रीमती संपदा वागळे, ठाणे (पश्चिम)

२) द्वितीय क्रमांक रू. ३००/- (रू. तीनशे फक्त)
सरिता देशमुख, नाशिक

३) तृतीय क्रमांक रू. २००/- (रू. दोनशे फक्त)

सौ. कार्तिकी काळे, बोरिवली (पश्चिम)

सर्व पारितोषिक विजेत्यांचे अभिनंदन. विजेत्यांना पारितोषिके या वर्षीच्या सर्वसाधारण सभेमध्ये अध्यक्षांच्या हस्ते देण्यात येतील. त्यांना पत्राने तसे स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. पारितोषिके पात्र लेखांना 'संवाद'मध्ये क्रमश: प्रसिद्धी दिली जाईल. ज्या स्त्री-पुरुष सभासदांनी/सहसभासदांनी 'संवाद'च्या लेख स्पर्धेत भाग घेतला, त्या सर्वांचे संपादक मंडळातर्फे आभार.

- संपादक मंडळ, संवाद

## नातं

नातं कोणतंही..........
स्नेहाशिवाय टिकत नाही ।
अस्तित्व स्नेहाचं संपलं की,
ज्योत निरांजनाची तेवत नाही ।।१।।

नातं कोणतंही......
जिव्हाळ्याशिवाय वाढत नाही ।
ओलावा आत्म्याचा आटला की
नातं करपल्याशिवाय राहत नाही ।।२।।

नातं कोणतंही.....
सहवासाशिवाय फुलत नाही ।
वेल सहवासाची कोमेजली की
नात्याचा सुगंध दरवळत नाही ।।३।।

नातं कोणतंही....
एकतर्फी रूजत नाही ।
प्रतिसाद दुतर्फी नसेल तर,
नात्यात सौंदर्य पाझरत नाही ।।४।।

नातं कोणतंही....
ओढ रक्ताची विसरत नाही ।
दु:खात धावून गेल्याशिवाय
नात्याला समाधान मिळत नाही ।।५।।

- **पुंडलिक भेंडे,** पुसद
भ्रमणध्वनी - ९५५२२९२९०१

## रंग कवितेचे

पहिली माझी कविता हो प्रेयसीने वाचली
अर्धी लिहिली होती तरी अय्या किती छान म्हणाली!

दुसरी माझी कविता हो आईने ती 'पाहिली'
कौतुकाने सांभाळूनी पेटीतच ती ठेवली !

तिसरी माझी कविता हो बापाने वाच(व)ली
कागद मागे पुढे बघून कोरी बाजू वर ठेवली !

चौथी माझी कविता हो दुसऱ्याने ती पाहिली
खो खो हसून तिसऱ्याकडून तीनशे मित्रात फिरवली!

पाचवी माझी कविता हो बायकोने वाचली
काही समजली नाही तिला रद्दीतच तिने घातली!

सहावी माझी कविता हो शेजाऱ्याने वाचली
नेहमीप्रमाणे 'जळून' त्याने तुकडे करून भिरकावली!

सातवी माझी कविता हो टीकाकाराने चाळली
त्यालाही ना कळल्यामुळे 'सर्वोत्तम' कविता ठरली!!

- **विजयकुमार देशपांडे**, सोलापूर
भ्रमणध्वनी - ९०११६६७१२७

## आपली बँक

वैभवाची गंगा
परंपरेची यमुना
नवतंत्राची सरस्वती
स्टेट बँकेच्या वर्तुळात
प्रकाशाच्या ज्योती ।।१।।

ग्राहक हाच विधाता
सेवा हीच प्रतिष्ठा
स्वप्नांना आकार
अमर्याद अवसर ।।२।।

भविष्यांना जन्म इथे
सीमांना अंत नाही
विश्वासाच्या वर्तुळात
स्टेट बँकेला पर्याय नाही ।।३।।

- **अरूण सावरकर**, मुंबई
भ्रमणध्वनी - ९८९२८१२८३८

## अभिनंदनीय

अमरावती येथील सभासद श्री. विनायक डोंगरे यांची स्नुषा सौ. संपदा यांना 'संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती तर्फे 'आचार्य' ही पदवी प्राप्त केल्याबद्दल सन्मानीत करण्यात आले. 'स्टडीज ऑन अँटीबायोटिक प्रोड्युसिंग ॲक्टीमोमायसिटीस फ्रॉम सलाईन बेल्ट ऑफ विदर्भ रिजन' हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता.

विदर्भातील खारपाण पट्ट्यातील जमिनीतून अतिशय प्रभावी प्रतिजैविके तयार करणारे तसेच जे मानवी व प्राण्यांच्या रोगजंतूंना नाहिसे करू शकतात अशा प्रकारचे संशोधन अमरावती विद्यापीठात प्रथमच त्यांनी सादर केले.

त्यांचा नातू चि. श्रीकर याला 'ॲबॅकस स्टेट लेव्हल' स्पर्धेत सुवर्ण पदक मिळाले. तो स्कूल ऑफ स्कॉलर अमरावती शाळेचा विद्यार्थी आहे.

या सुयशाबद्दल त्यांचे असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन!

**- सेक्रेटरी**

## अभिनंदनीय

आपले एक सभासद श्री. अरूण काकडे एक सेवाभावी कार्यकर्ते आहेत. त्यांचे अनेक समाजोपयोगी उपक्रम चालू असतात. नुकताच श्री. काकडे यांनी आपल्या तरडगाव (ता. फलटण) या गावी लहान मुलांसाठी 'आई संस्कार वर्ग' सुरू केला आहे. समस्त काकडे कुटुंबियांनी स्वखर्चाने हा वर्ग चालविला आहे हे विशेष.

पेन्शनर्स असोसिएशनतर्फे श्री. अरूण काकडे ह्यांचे अभिनंदन!

**- सेक्रेटरी**

## अभिनंदनीय

आपले एक सभासद श्री. शामकांत पटवर्धन यांना 'पुणे आयडॉल' या संगीत स्पर्धेत ४० वर्षांवरील वयोगटामध्ये दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस मिळाले. या सुयशाबद्दल श्री. पटवर्धन यांचे असोसिएशनतर्फे अभिनंदन!

**- सेक्रेटरी**

## अभिनंदनीय

आपले सभासद श्री. व्ही. एस. बापट ह्यांची नात कु. ईशानी हिला इंटर नॅशनल ऑलंपियाड ऑफ इंग्लिश भाषा २०१२ न्यू दिल्ली तर्फे इंग्लिश विषयात प्राविण्य मिळविल्याबद्दल सुवर्णपदक मिळाले.

त्याच प्रमाणे श्री. व्ही. एस. बापट ह्यांच्या मुलीचा मुलगा कु. यशोधन ह्यास मुंबई सायन्स टीचर्स असोसिएशनने डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक (ज्युनियर) कॉम्पिटिशन २०१२ तर्फे प्रमाणित केलेल्या स्पर्धेत रौप्यपदक मिळाले. पेन्शनर्स असोसिएशनतर्फे दोघांचे अभिनंदन!

**- सेक्रेटरी**

## अभिनंदनीय

आपले एक सभासद श्री. विनायक धोंडो मराठे ह्यांचा नातू कुमार ध्रुव परांजपे (मुलीचा मुलगा) ह्यास २०१० मध्ये ग्रिनिज वेधशाळेतर्फे झालेल्या Astronomny फोटो स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे जागतिक पारितोषिक मिळाले आहे. त्याने काढलेला ग्रहणाचा फोटो यू.के.मध्ये प्रसिद्ध झाला असून ग्रिनिज वेधशाळेने त्यास Royalty देऊ केलेली आहे. पेन्शनर्स असोसिएशनतर्फे कुमार ध्रुवचे असोसिएशनतर्फे अभिनंदन!

**- सेक्रेटरी**

## अभिनंदनीय

आपले सातारा येथील सदस्य श्री. सु. शं. सरदेशमुख हे कवी म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांची ७ पुस्तके व एक कॅसेट प्रकाशित झाली आहे. आता त्यांनी नाट्यलेखनात पदार्पण केले आहे. फलटणहून प्रसिद्ध होणाऱ्या लोकजागरच्या दिवाळी २०११ च्या अंकात त्यांचे 'सुखनिवास' हे नाटक प्रसिद्ध झाले आहे. हे नाटक तीन अंकी प्रयोगक्षम असून त्यात त्यांनी तीन गाणी घातली आहेत. भावा बहिणीच्या सुंदर नात्यावर हे नाटक आधारित आहे. श्री. सरदेशमुख यांच्या पुढील लेखन कार्यास पेन्शनर्स असोसिएशनतर्फे शुभेच्छा!

संपर्कासाठी – ९४२०४८५५६३

**- सेक्रेटरी**

# लाईफ सर्टिफिकेट

पंचवीस वर्षापूर्वीची घटना आहे. मी पुण्यातील डेक्कन जिमखाना शाखेत वैयक्तिक बँकिंग विभागात उपप्रबंधक या पदावर काम करीत होतो. तेथे भांडारकर रोड, प्रभात रोड, आपटे रोड तसेच लॉ कॉलेज रोड या भागातील रहिवासी बँकेचे खातेदार होते. रिटायर्ड आय्. सी. एस्. आय. पी. एस्. सरकारी खात्यामधील उच्च पदस्थ, परदेशात उच्च पदावर काम केलेल्या व्यक्ति खातेदारांमध्ये होत्या. तसेच मिलीटरीमधील भूदल व हवाई दलातील अधिकाऱ्यांचा पगार दर महिन्याला बँकेच्या खात्यामध्ये जमा होत असल्यामुळे ते अधिकारी पुणे भेटीत बँकेत येत असत. डेक्कन जिमखाना भागात राहणाऱ्या प्रतिष्ठित मंडळींची सुद्धा खाती शाखेत होती. त्यामुळे सतत व्हि. आय.पी. ग्राहकांची ये जा चालू असे. या प्रतिष्ठित खातेदाराकडे लक्ष ठेवून त्यांना उत्तम सेवा देण्यासाठी अधिकारी वर्गाला लक्ष ठेवावे लागत असे. उपप्रबंधक असल्यामुळे माझ्यावर ती जबाबदारी सोपविली होती.

ही मंडळी बँकेच्या व्यवहारासाठी आली असता त्यांना तत्परतेने सेवा देणे आवश्यक असे. त्यावेळेस टेबलावर ठेवलेला चहा बराच वेळ तसाच राहून जाई. क्वचित प्रसंगी पाहुण्यांच्या बरोबर चहा, त्यानंतर थोड्याच वेळात दुसऱ्या ग्राहकाबरोबर कोल्ड ड्रिंक तर काही वेळाने कॉफी घ्यावी लागे. या ग्राहकांमध्ये पेन्शनर मंडळीसुद्धा बँकेच्या दृष्टीने मोठे डिपॉझिटर होते. त्यामुळे त्यांची योग्य ती दखल घेतली जात असे.

एकदा एक व्ही. आय.पी. पेन्शनर ग्राहक दुपारी बँकेत आले. त्यांचे बरोबर त्यांचे स्नेही होते. म्हणाले, ''मी मुद्दाम मित्राला बरोबर घेऊन आलो. त्याला म्हटले की बघ बँकेत कसे स्वागत होते व काम किती झटपट होते.''

एप्रिल महिन्यात हयातीचा दाखला घेण्यात येत असे. एक दिवस दुपारी २ वाजता मला फोन आला. फोनवरून बोलणारी खातेदार व्यक्ति म्हणाली, 'मी आजारी होतो. पंधरा दिवस हॉस्पिटलमध्ये होतो. मी अद्यापही घरी झोपून आहे. मी बँकेत समक्ष येऊ शकत नाही. मग माझे 'लाईफ सर्टिफिकेट' कसे देऊ?' मी त्यांना सांगितले की, ''काळजी करू नका. सर्टिफिकेट देण्यासाठी अजून मुदत आहे. मी स्वत: तुमच्या घरी येऊन ते घेऊन जाईन.' एवढे बोलून मी फोन ठेवला. हे संभाषण मी लक्षात ठेवले होते. त्या दिवशी सायंकाळी मॅनेजर व मी त्या पेन्शनरला भेटण्यासाठी त्यांच्या घरी गेलो. घराची बेल वाजवली. घरामध्ये शांतता असावी, असे जाणवले. पाच मिनिटे झाली तरी दार उघडलं नाही. पुन्हा बेल वाजवल्यावर एक गृहस्थ बाहेर आले. त्यांनी विचारले, ''कोण पाहिजे?'' ''साहेबांना भेटावयाचे आहे, त्यांनी आम्हाला भेटण्यास बोलविले आहे.'' ते गृहस्थ आत गेले. दुसरी व्यक्ति बाहेर आली. त्यांनी आमची चौकशी केली. ''तुम्ही कोठून आला आहात? काय काम आहे?'' आम्ही सविस्तरपणे फोनवरील संभाषणाचा संदर्भ दिला. साहेबांना सांगा ना, स्टेट बँकेतून मॅनेजर तुम्हाला भेटावयास आले आहेत. ते आम्हा दोघांना चांगले ओळखतात. या उपचारामध्ये दहा/पंधरा मिनिटे गेली. आम्ही घराच्या बाहेर उभे राहिलो होतो. इतक्यात घरातून एक वेगळीच व्यक्ति बाहेर आली. ते म्हणाले, ''अहो, साहेब तुम्हाला भेटू शकणार नाहीत. आज सकाळी १० वाजता साहेब हे जग सोडून पुढील प्रवासाला निघून गेले आहेत.'' हे शब्द ऐकल्यावर माझ्या हातातील 'लाईफ सर्टिफिकेटचा' फॉर्म केव्हा गळून पडला. ते कळलेच नाही.

**- ग. ल. देव,** पुणे

## प्रतिक्रिया

'संवाद' चा एप्रिल २०१२ चा अंक हातात आला आणि लगेचच पूर्णपणे वाचून काढला. सर्वच लेख एकसे बढकर एक आहेत. 'संवाद' अधिकाधिक दर्जेदार होत आहे आणि हा आलेख असाच वाढत राहो ही शुभेच्छा!

'सेव्ह द इंडियन रूपी' हा श्री. बी. के. घोष व श्री ए. के. कुलकर्णी यांचा लेख प्रत्येक सामान्य भारतीयाला आपल्या देशासाठी काही प्रत्यक्ष कृती करण्याचा मार्ग दाखवतो. देशाचे आर्थिक स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी बहुसंख्य लोकांकडून अशा कृतीची नितांत गरज आहे. Buy Indian to be Indian हे तत्व आपण ज्येष्ठांनी प्रत्यक्ष कृतीत आणले तरच आपण इतरांना विशेषत: तरुण पिढीला यासाठी उद्युक्त करू शकू.

**- गोविंद वि. सोवनी,** तासगाव

## श्री बालाजीची सासू

सासरे - (प्रथमच आलेल्या जावयास) जावईबापू, आता चांगले एक आठवडाभर राहा. तुम्हाला श्रीबालाजीची सासू भोजनासाठी करू.

जावई - हे काय भलतेच?

सासरे - (हसत हसत) अहो श्रीखंड, बासुंदी, लाडू, जिलेबी, चिरोटे, साखरभात, सुधारस ही पक्वान्ने करण्याचे मनात आहे.

**- सुभाष सरदेशमुख** (सातारा)

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession register No. PNCW/M-144/2011-2013 Dated 10.12.2010
Licence to post at Market Yard P.S.O. on 25th of each Month

## आनंद मार्ग

एक दोन एक दोन
करा चला अन्नदान

तीन चार तीन चार
अंगी बाणा सदाचार

पाच सहा पाच सहा
दु:खितांचं सुख पहा

सात आठ सात आठ
मित्रत्वाची बांधा गाठ

नऊ दहा नऊ दहा
जीवनी आनंदी रहा

**- द. श्री. विद्वांस,**
बदलापूर

## संवाद

बोलके आभाळ धरणीशी, रेज संवाद साधते
ऊन पाऊस संकेत भाषा, धरतीला खूप भावते ।।धृ.।।

प्रेमाची सोनकिरणे सतत, देतात ऊब अवनीला
फुलून फुले पिकूनी फळे, येतो बहर सृष्टीला
तेजस्वी किरणाचे पायस, वसुंधरा प्राशन करते ।।१।।

आकाशाला खुलवे गुलाबी, रोमांचांनी मस्त गारवा
गगनात मावत नाही, अनोख्या आनंदाचा ठेवा
दवांचे आनंदाश्रू मग, भूमी मजेत झेलते ।।२।।

येतो पाऊस नेमेचि, पसरे मृद्गंधाचे अत्तर
जणू आकाशाच्या पत्राला, धरित्रीचे लाजून उत्तर
इंद्रधनूचे हर्षाने नभ, छान तोरण बांधते ।।३।।

**- सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर,** विरार

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा ‘संवाद’ चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

Printed Matter

*If Undelivered Please Return to :*

**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.